POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१५७ ● मुंबई, गुरुवार, ०८ जानेवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## ‘अपघात व्हायची वाट पाहताय का?’

### अंधेरी स्थानकावर प्रचंड गर्दी... महिनाभराच्या हफब्लॉकमुळे प्रवाशांचे हाल



**अचानक प्लॅटफॉर्ममध्ये बदल, प्रवाशांची तारांबळ**

अंधेरी स्थानकावरील प्लॅटफॉर्मवर प्रवाशांची प्रचंड गर्दी होत आहे. त्यातच रेल्वे प्रशासनाकडून अचानक फलाटांमध्ये बदल केला जात असल्यामुळे लोकल पकडण्यासाठी फूट ओव्हरब्रिजही प्रवाशांनी खचाखच भरून जातो. प्लॅटफॉर्मवर उभं राहायलाही जागा नाही, फूट ओव्हरब्रिजचीही तिची स्थिती, त्यामुळे अनेकांना जीव धोक्यात घालून दुसऱ्या फलाटावर जाण्यासाठी थेट रेल्वे रुळावर उतरावं लागतंय, अंधेरी स्थानकाचा असाच एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

अचानक होणाऱ्या प्लॅटफॉर्म बदलांमुळे अनेक प्रवासी फूट ओव्हरब्रिजवरून धावताना, तर काही जण थेट रुळ ओलांडून ट्रेन पकडण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत.

अचानक होणाऱ्या प्लॅटफॉर्म बदलांमुळे अनेक प्रवासी फूट ओव्हरब्रिजवरून धावताना, तर काही जण थेट रुळ ओलांडून ट्रेन पकडण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत.

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

पश्चिम रेल्वेवर सुरू असलेल्या महिनाभराच्या मोठ्या ब्लॉकमुळे मुंबईतील अंधेरी रेल्वे स्थानकावर प्रवाशांची प्रचंड गर्दी होत आहे. या गर्दीमुळे प्रवाशांचे हाल होत असून, त्यांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ‘एक्स’वर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये अंधेरी स्थानकावरील गोंधळ आणि धोकादायक परिस्थिती स्पष्टपणे दिसत आहे.

**३० दिवसांचा मोठा ब्लॉक; १८ जानेवारीपर्यंत परिणाम**

पश्चिम रेल्वेवर कांदिवली ते बोरीवली दरम्यान सहाव्या मार्गाच्या कामासाठी ३० दिवसांचा मोठा ब्लॉक सुरू आहे. हा ब्लॉक डिसेंबर अखेरीस सुरू झाला असून १८ जानेवारी २०२६ पर्यंत तो चालणार आहे. यामुळे उपनगरीय लोकल सेवांवर मोठा परिणाम झाला आहे.

**दररोज शेकडो लोकल रद्द, लांबपल्ल्याच्या गाड्यांनाही फटका**

या ब्लॉक दरम्यान दररोज सुमारे २०० ते ३५० लोकल फेऱ्या रद्द केल्या जात आहेत. त्यामुळे आधीच गर्दीने त्रस्त असलेल्या प्रवाशांची अधिकच गैरसोय होत आहे. अंधेरी आणि बोरीवलीसारख्या मोठ्या स्थानकांवर याचा सर्वाधिक परिणाम दिसतोय. या ब्लॉकचा परिणाम केवळ लोकल सेवांपुरता मर्यादित राहिलेला नाही. अहमदाबाद-बोरीवली एक्सप्रेससारख्या मेल-एक्सप्रेस गाड्याही वसई रोडसारख्या स्थानकांवरच थांबवल्या जात आहेत. त्यामुळे लांब पल्ल्याच्या प्रवाशांसह रोज प्रवास करणाऱ्या मुंबईकरांची मोठी गैरसोय होत आहे.

**“अपघात होईपर्यंत वाट पाहणार का?” - संतप्त प्रवाशांचा सवाल**

व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर अनेक प्रवाशांनी पश्चिम रेल्वेच्या व्यवस्थापनावर नाराजी व्यक्त केली आहे. गर्दी नियंत्रणासाठी रेल्वे संरक्षण दलाचे कर्मचारी पुरेशा प्रमाणात नसल्याचा आरोप प्रवाशांकडून केला जात असून, “मोठ्या दुर्घटनेची वाट बघताय का?”असा सवाल सोशल मीडियावर उपस्थित केला जात आहे. तर, सहावी लाईन पूर्ण झाल्यानंतर भविष्यात प्रवासी क्षमतेत वाढ होईल आणि गर्दी कमी होईल, असं पश्चिम रेल्वे प्रशासनाचं म्हणणं आहे. मात्र, सध्याची परिस्थिती प्रवाशांसाठी धोकादायक ठरत असल्याचं चित्र आहे. ब्लॉकच्या काळात योग्य नियोजन, वेळेवर माहिती आणि पुरेशी सुरक्षा व्यवस्था करावी, अशी जोरदार मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

## भावपूर्ण श्रद्धांजली

मृत्यू
मंगळवार दिनांक
३०/१२/२०२५
रोजी



**दशक्रिया विधी**

दिनांक ०८/०१/२०२६, गुरुवार, सकाळी ०७.३० वाजता जेसेल पार्क चौपाटी, भाईंदर भाईंदर मीरारोड

**तेरावे (श्राद्ध) विधी**

दिनांक ११/०१/२०२६, रविवार राहत्या घरी करण्यात येईल. पत्ताः गुरुप्रसाद बंगला, जुना गोल्डन नेस्ट, फेज ३, कवीन मेरी शाळेजवळ, वेदकेअर हॉस्पिटलच्या बाजूला, भाईंदर (पूर्व) ४०१ १०७

**संपर्क :**

गुरुप्रसाद नाईक ९५९४४१८१८१, ८६९२०३३३३०

(येतांना कोणीही दुखवटा सोबत आणू नये.)

अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले, तरी त्यांच्या आत्म्यास चिरःशांती लाभों हिच ईश्वरचरणी प्रार्थना!!!

## कै. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक

शोकाकुल : समस्त नाईक परिवार

## प्रदूषण नियंत्रण मंडळाला उच्च न्यायालयाचा झटका

### अधिकृत प्री-प्रोसेसिंग सुविधेवर निर्बंध लादण्याचा ‘एमपीसीबी’ला अधिकार नाही



■**मुंबई। प्रतिनिधी,**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला (एमपीसीबी) उच्च न्यायालयाने झटका दिला. एमपीसीबीला धोकादायक आणि इतर कचरा (व्यवस्थापन आणि सीमापार वाहतूक) नियम, २०१६ अंतर्गत अधिकृत प्री-प्रोसेसिंग सुविधेच्या व्यावसायिक कामकाजावर निर्बंध लादण्याचा अधिकार नाही, असा महत्त्वपूर्ण निवाळा मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने दिला आहे.

ग्रीन जेने एन्व्हायरो प्रोटेक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीने उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. त्या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठापुढे सुनावणी झाली. याचिकाकर्त्या कंपनीला प्री-प्रोसेसिंग सुविधा स्थापन करण्याची आणि चालवण्याची संमती देण्यात आली होती. त्या माध्यमातून कंपनीला महाराष्ट्रातील उद्योगांकडून दरवर्षी २,७५,००० मेट्रिक टनपर्यंत धोकादायक कचऱ्यावर प्री-प्रोसेसिंग करण्याची परवानगी मिळाली होती.

तथापि, नंतर संबंधित परिपत्रकात सुधारणा करण्यात आली आणि याचिकाकर्त्या कंपनीला मोठ्या औद्योगिक क्षेत्रांमध्ये असलेल्या उद्योगांकडून धोकादायक कचरा गोळा करण्यास मनाई करण्यात आली. सुधारित परिपत्रकाने घातलेल्या निर्बंधांमुळे कंपनीचे कार्यक्षेत्र राज्याच्या भागापुरते मर्यादित राहिले. परिणामी, व्यवसायाची व्यवहार्यता संपुष्टात आली, असा दावा याचिकाकर्त्या कंपनीने केला होता. त्याची गंभीर दखल घेत खंडपीठाने एमपीसीबीच्या सुधारित परिपत्रकावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

१५ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या सुधारित परिपत्रकाला कोणतेही कायदेशीर महत्त्व नाही. महाराष्ट्रात असलेल्या उद्योगांकडून प्री-प्रोसेसिंग/को-प्रोसेसिंगसाठी धोकादायक कचरा आणि इतर कचरा स्वीकारण्याच्या कंपनीच्या अधिकारांवर मयार्दा घालण्यासाठी ते लागू केले जाऊ शकत नाही. संबंधित परिपत्रक बेकायदेशीर, मनमानी आणि भेदभावपूर्ण आहे. ते संविधानाच्या अनुच्छेद १९(१)(जी) अंतर्गत कंपनीच्या अधिकाराचे उल्लंघन करते, असे निरिक्षण नोंदवत खंडपीठाने संबंधित परिपत्रक रद्द केले.

## राज्यात पुणेकरांची अवयवदानात बाजी

### मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगरलाही टाकले मागे



**अवयवदात्यांमध्ये ७२ टक्के पुरुष, २८ टक्के महिला**

मेंदूमृत्यूची (ब्रेनडेड) कारणे पाहता २८ दात्यांचा मृत्यू अपघात किंवा इजा (ट्रॉमा) यामुळे झाला असून, ५१ दाते आजारपण किंवा इतर नॉन-ट्रॉमा कारणांमुळे मेंदूमृत झाले. एकूण अवयवदात्यांपैकी ७२ टक्के पुरुष (५७ दाते), तर २८ टक्के महिला (२२ दाते) आहेत. महिला दात्यांमध्ये ऑस्ट्रेलियाचे नागरिकत्व असलेल्या महिलेचा समावेश आहे. पुणे विभागातील मेंदूमृत अवयव दात्यांमध्ये अपघातातांमुळे मृत्यू झालेले २८ दाते असून, ५१ दाते आजारपणासह इतर कारणांमुळे मृत्यू झालेले आहेत, अशी माहिती पुणे विभागीय अवयव प्रत्यारोपण समितीच्या समन्वयक आरती गोखले यांनी दिली.

■**मुंबई। प्रतिनिधी,**

पुणे शहराने २०२५ या वर्षात मरणोत्तर अवयवदानात संपूर्ण महाराष्ट्रात अग्रस्थान प्राप्त केले आहे. पुण्यातील झोनल ट्रान्सप्लांट को-ऑर्डिनेशन सेंटरने दिलेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षभरात राज्यात एकूण १५३ जणांचे मरणोत्तर अवयवदान झाले, त्यात पुण्यात ७९ मृतांच्या अवयवदानाचा यशस्वी समन्वय साधण्यात आला. या दातृत्वामुळे तब्बल २०७ गंभीर रुग्णांना नवीन आयुष्य मिळाले आहे. पुणे विभागाने आघाडी घेत मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगरलाही मागे टाकले आहे.

राज्यात मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या चार विभागीय प्रत्यारोपण समन्वय समित्या कार्यान्वित आहेत. गेल्या वर्षी पुणे विभागात सर्वाधिक ७९ जणांचे तर मुंबई विभाग ५३, नागपूर विभाग १६ आणि छत्रपती संभाजीनगर विभाग ५ असे मरणोत्तर अवयवदान झाले. पुणे विभागात पुण्यासह, कोल्हापूर, सांगली, सातारा, अहिल्यानगर, सोलापूर, नाशिक, धुळे आणि जळगाव या जिल्ह्यांचा समावेश आहे. पुण्यात झालेल्या २०७ प्रत्यारोपणामध्ये ११७ मूत्रपिंड, ६७ यकृत, १३ फुफ्फुसे आणि ४ हृदयांचा समावेश आहे.

**मूत्रपिंड प्रत्यारोपणांची संख्या सर्वाधिक**

या प्रत्यारोपणांमध्ये मूत्रपिंड प्रत्यारोपणांची संख्या सर्वाधिक असून, त्यामुळे ११७ जणांना जीवनदान मिळाले आहे. त्या खालोखाल ६७ यकृत प्रत्यारोपण, १३ फुफ्फुस प्रत्यारोपण आणि चार हृदय प्रत्यारोपण करण्यात आले, तसेच हृदय आणि फुफ्फुस एकत्रित प्रत्यारोपण एक, मूत्रपिंड आणि हृदय प्रत्यारोपण एक, तसेच मूत्रपिंड आणि स्वादुपिंड यांचे एक प्रत्यारोपण झाले आहे.

**देशात महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर**

राज्यासह देशातही अवयवदानाबाबत जनजागृती वाढत असून त्यामुळे अनेक गंभीर रुग्णांना नवसंजीवनी मिळत आहे. देशातील मरणोत्तर अवयवदानांमध्ये महाराष्ट्राने चौथे स्थान प्राप्त केले आहे. सर्वाधिक मरणोत्तर अवयवदान तमिळनाडूमध्ये (२६७) झाले असून त्याखालोखाल तेलंगणा (२०५) आणि कर्नाटकने (१९८) स्थान प्राप्त केले आहे. महाराष्ट्र १५३ मरणोत्तर अवयवदानासह चौथ्या स्थानी असून गुजरातने (१५२) पाचवा क्रमांक पटकावला आहे.

**कार्यालय प्रमुखाची सर्व जबाबदारी**

कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण, प्रतिबंध, मनाई व निवारण अधिनियम २०१३ नुसार, १० किंवा त्याहून अधिक अधिकारी-कर्मचारी असलेल्या सर्व आस्थापनांना अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. या अधिनियमाच्या कलम १९ अन्वये कार्यालय प्रमुखांची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे. जर कोणत्याही कार्यालयाने ही समिती स्थापन केली नसल्यास किंवा अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन केल्यास, कलम २६ नुसार ५० हजारांपर्यंत दंड करण्यात येणार आहे. त्यामुळे महिला सुरक्षा अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.

## महिलांच्या सुरक्षेसाठी तक्रार समिती स्थापन करा अन्यथा ५० हजारांचा दंड

### राज्य सरकारचा आस्थापनांना इशारा... तत्काळ या पोर्टलवर नोंदणी करून माहिती सादर करावी




■**मुंबई। प्रतिनिधी,**

कामाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षेला प्राधान्य देणे प्रत्येक अस्थापनांना क्रमप्राप्त आहे. यासाठी प्रत्येक अस्थापनात महिलांच्या सुरक्षेसाठी तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक असून याकडे दुर्लक्ष केल्यास ५० हजारांपर्यंत दंड करण्यात येईल, असा इशारा राज्य सरकारने दिला आहे.

महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने केंद्र सरकारने शीबॉक्स पोर्टल तयार केले असून सर्व आस्थापनांनी या पोर्टलवर आपले कार्यालय नोंदवणे अनिवार्य आहे. मुंबई उपनगरातील सर्व आस्थापनांनी तत्काळ या पोर्टलवर नोंदणी करून अंतर्गत समितीची तसेच कार्यालयाची अद्ययावत माहिती सादर करावी, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (मुंबई उपनगर) एस. टी. कुऱ्हाडे यांनी केले आहे.

**येथे संपर्क साधा!**

अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर प्रशासकीय इमारत, पहिला मजला, दुसरा टप्पा, आर. सी. मार्ग, चेंबूर येथे संपर्क साधावा. दूरध्वनी - ०२२-२५२३२३०८ E-mail : wcdmumupnagar@gmail.com यावर संपर्क करावा, असेही नमूद करण्यात आले आहे.

## २०२६च्या अखेरीस सुरू होणार जोगेश्वरी टर्मिनस



■**मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईत सध्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर टर्मिनस, कुर्ला टर्मिनस, मुंबई सेंट्रल टर्मिनस, वांद्रे टर्मिनस ही रेल्वे टर्मिनस कार्यरत आहेत. यात २०२६ च्या अखेरीस जोगेश्वरी टर्मिनसची भर पडणार आहे. जोगेश्वरी टर्मिनस या वर्षाच्या अखेरीस पूर्ण होईल. प्रवाशांना तेथून प्रवास सुरू करता येईल. लांब पल्ल्याच्या मेल आणि एक्सप्रेस ट्रेनने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढावी यासाठी पश्चिम रेल्वेने हे टर्मिनस बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या टर्मिनसवर दररोज बारा जाणाऱ्या आणि तेवढ्याच येणाऱ्या लांब पल्ल्याच्या गाड्या थांबतील. यात प्रामुख्याने दिल्ली आणि उत्तर भारताच्या दिशेने जाणाऱ्या गाड्या असतील. अमृत भारत स्टेशन विकास योजनेचा भाग म्हणून जोगेश्वरी टर्मिनसचा विकास केला जाईल. नवीन टर्मिनसमुळे लांब पल्ल्याच्या रेल्वेची संख्या वाढण्यास मदत होईल. राम मंदिर आणि जोगेश्वरी स्थानकांदरम्यान रेल्वेच्या जमिनीवर हे नवीन रेल्वे टर्मिनस बांधले जात आहे. पश्चिम द्रुतगती महामार्गावरून प्रवास करणाऱ्यांसाठी जोगेश्वरी टर्मिनस सोयीचे ठरेल. नव्या टर्मिनसच्या कव्हर शेडचे बांधकाम, सेवा इमारत, प्लॅटफॉर्मचे काम आणि स्टेशन इमारतीचे बांधकाम सुरू आहे. त्यानंतर ट्रॅक टाकण्याचे काम सुरू होईल. हा ७६.८७ कोटी रुपयांचा प्रकल्प आहे. टर्मिनसच्या पहिल्या टप्प्यासाठी ५१ कोटी रुपयांची निविदा प्रक्रिया राबवण्यात आली. यात दोन प्लॅटफॉर्म आणि तीन लाईन बांधण्याचा समावेश होता. प्रकल्पातील विलंब आणि इतर कारणांमुळे आता बजेट ७६ कोटींवर पोहोचले आहे.

### शिष्यवृत्ती योजनेतील बोगस लाभार्थींबाबत पालिका आक्रमक

## सुमारे ४८ हजार विद्यार्थ्यांनी अर्ज केले

■**नवी मुंबई। प्रतिनिधी,**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या शिष्यवृत्ती योजनेतील बोगस लाभार्थ्यांचा शोध घेण्यासाठी महापालिका प्रशासनाने ठोस पावले उचलली आहेत.

शिष्यवृत्तीसाठी सुमारे ४८ हजार विद्यार्थ्यांनी अर्ज केले असून, त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची सखोल पडताळणी करण्यासाठी संबंधित शाळा व महाविद्यालयांना पत्र पाठवण्यात आले आहे. शाळा-महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांची कागदपत्रे अधिकृत असल्याची खात्री मिळाल्यानंतरच त्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरवले जाणार आहे. त्यामुळे दरवर्षी नोव्हेंबरपर्यंत मिळणारी शिष्यवृत्ती यंदा मिळण्यास उशीर होत असला, तरी पारदर्शकतेसाठी हे पाऊल उचलण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय आहे.

२०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी सुमारे ४८ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज करून आवश्यक कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड केली आहेत. महापालिकेचे उपायुक्त किसनराव पालांडे यांच्या मार्गदर्शनाखाली समाज विकास विभागाने सर्व अर्जांची छाननी केली असता, काही विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांमध्ये विसंगती व संशयास्पद बाबी आढळून आल्या. त्यामुळे प्रशासनाने संबंधित विद्यार्थी ज्या शाळा किंवा महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत, त्या संस्थांना पत्र पाठवून कागदपत्रांची पडताळणी करण्यास सांगितले आहे.

ही योजना सुरू झाली तेव्हा अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे २५ हजार होती. पुढील काळात ती ३० ते ३२ हजारांपर्यंत वाढली, तर यंदा थेट ४८ हजार विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी अर्ज केल्याने प्रशासनाचे लक्ष वेधले गेले आहे.



“आतापर्यंत ऑनलाइन अजार्नुसार शिष्यवृत्तीचे वाटप केले जात होते. मात्र, आता अधिक काटेकोर पडताळणी करण्यात येत आहे. ऑनलाइन अर्जात नमूद केलेल्या माहितीनुसार संबंधित विद्यार्थी ज्या शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेत आहे, त्या संस्थेकडून माहिती मागवली जात आहे. सर्व शाळा व महाविद्यालयांना तसे पत्र पाठवण्यात आले असून, विद्यार्थ्यांनी सादर केलेली माहिती आणि संस्थांनी दिलेली माहिती यांची तुलना करूनच शिष्यवृत्तीचे अंतिम वाटप करण्यात येणार आहे.”
-किसनराव पालांडे, उपायुक्त (प्रशासन)

## दीनानाथ मंगेशकर रुग्णालय दोषी

### गर्भवती महिलेच्या मृत्यूप्रकरणी फौजदारी कारवाई



■**पुणे। प्रतिनिधी,**

पुण्यातील गर्भवती महिला तनिषा उर्फ ईश्वरी भिसे यांच्या दुर्दैवी मृत्यूप्रकरणी दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रशासन दोषी ठरले आहे. प्रकरणी धमादार्य आयुक्तांनी रुग्णालयाचे विश्वस्त पंडित हृदयनाथ मंगेशकर, भारती मंगेशकर, उषा मंगेशकर, आदिनाथ मंगेशकर, तसेच डॉ. धनंजय केळकर, डॉ. उल्कांत कुर्लेकर, डॉ. जितेंद्र क्षीरसागर, विधिज्ञ पी. एम. खिरे, सचिन व्यवहारे, आर. पी. जोशी आणि डॉ. प्रसाद राजहंस यांच्यावर फौजदारी कारवाई करण्याची शिफारस केली आहे.

गेल्या वर्षी एप्रिल महिन्यात गर्भवती तनिषा भिसे यांना तातडीने प्रसूतीसाठी रुग्णालयात दाखल केले गेले होते. मात्र, रुग्णालयाने अनामत रक्कम भरली नसल्याचा आधार देत तिला उपचारास नकार दिला. उशीर झाल्यामुळे तिला दुसऱ्या रुग्णालयात हलवावे लागले, पण उपचारास उशीर झाल्यामुळे ती मृत्युमुखी पडली. अहवालानुसार, रुग्णालय प्रशासन दोषी आढळले आहे. हा खटला सहधमार्दायायुक्त कार्यालयाचे निरीक्षक सचिन बाकल यांनी न्यायालयात दाखल केला आहे.

दोष सिद्ध झाल्यास संबंधित विश्वस्तांना एक वषार्चा कारावास, दंड किंवा दोन्ही शिक्षा भोगावी लागू शकते. सध्या हा प्रकरण शिवाजीनगर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्याकडे वर्ग करण्यात आले आहे.




संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# ‘माझ्या महाराष्ट्रा’ला कुठे नेऊन ठेवले आहे?




महाराष्ट्रात १५ जानेवारी या दिवशी महापालिकेच्या निवडणुका होणार आहेत. या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया राज्यात नुकतीच पूर्ण करण्यात आली; पण या वेळी जे काही घडले किंवा अजूनही घडत आहे, ते महाराष्ट्रासाठी धक्कादायक, चिंताजनक आणि तितकेच लाजिरवाणेही आहे. ‘माझ्या महाराष्ट्रा’ला कुठे नेऊन ठेवले आहे?’, असा प्रश्न विचारण्याची वेळ दुर्दैवाने ओढवली आहे. ‘निवडणूक म्हणजे लोकशाहीचा उत्सव’ असे मानले जाते; पण सद्यःस्थिती पहाता ‘याला खरोखर उत्सवाचे स्वरूप आले आहे का?’ हा प्रश्न पडतो. ‘अर्ज भरणे, उमेदवारी मिळवणे, तिकीटवाटप, जागावाटप, आरक्षण आणि पक्षांतर्गत गटबाजी या घटनांना आलेले विकृत अन् हिंसक स्वरूप पहाता हा उत्सव नव्हे, तर राज्यावर ओढवलेले संकटच आहे कि काय’, असे जनतेला वाटत आहे. इच्छुकांची संख्या प्रचंड मोठी; मात्र जागा मर्यादित असल्याने मोठ्या प्रमाणात संघर्ष निर्माण होत आहे. याचे पर्यवसान वाद, हिंसा, हाणामारी यांत होतांना दिसते. महाराष्ट्रात कुठेच काही आलबेल राहिलेले नाही. काही प्रातिनिधिक उदाहरणे पाहूया. पुण्यात एका पक्षाच्या उमेदवाराने संतापाच्या भरात दुसऱ्या उमेदवाराचा उमेदवारी अर्ज फाडून खाल्ला आणि कारवाई टाळण्यासाठी शौचालयात जाऊन लपला. काही ठिकाणी कार्यकर्ते अप्रसन्न होऊन प्रक्षोभक झाल्याने उमेदवारांना पोलीस संरक्षण द्यावे लागले. तिकीट नाकारले गेल्याने अन्याय झाल्याच्या भावनेतून अनेक निष्ठावान कार्यकर्त्यांनी पक्षाच्या खासदारांच्या गाड्या अडवून शिवीगाळ केली. काहींनी तर आत्मदहनाचा प्रयत्न केला. अनेक ठिकाणी महिला कार्यकर्त्या अधिक आक्रमक झाल्याचे दिसून आले. काहींची रडारडही झाली. अनेक कार्यकर्ते वर्षभरापासून निवडणुकीची सिद्धता करत होते. स्वबळावर लढण्याचीही त्यांची इच्छा होती; पण अंतर्गत राजकारणामुळे त्यांना उमेदवारीच मिळाली नाही. काही ठिकाणी ‘उभ्या केलेल्या उमेदवाराला आम्ही कसे पाडून दाखवतो’, अशी चढाओढही निर्माण झाली आहे. हे चित्र भयावह आहे. यामुळे राज्यात सर्वत्र मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला आहे. काही ठिकाणी तो उघडपणे दिसून येतो, तर काही ठिकाणी आतल्या आत धुमसत आहे. याचा थेट परिणाम प्रचार किंवा मतदान यांवरही होण्याची शक्यता आहे. निवडणुकीच्या प्रारंभीच सगळीकडे गोंधळ, अस्थिरता, अनिश्चितता आणि निराशा असे चित्र दिसून येत आहे. नाराजी नाट्याच्या (कु)संस्कृतीमुळे राज्याची प्रतिमा मलिन होत चालली आहे. महापालिकेच्या निवडणुकीचा उद्देश काय असतो? तर संबंधित क्षेत्राचा विकास करणे! त्यात पाणीपुरवठा, रस्ते, कचरा व्यवस्थापन, वाहतूक, आरोग्य आणि शिक्षण अशा सूत्रांचा समावेश असतो; पण सध्याचे अस्थिर राजकारण पहाता ही सर्व सूत्रे दुय्यम दर्जावर गेलेली आहेत अन् पहिल्या क्रमांकावर आले आहे, ते व्यक्तीगत राजकारण! असे असेल, तर नगरांचा पर्यायाने राज्याचा विकास साध्य होणार कसा? गंभीर गुन्हे करणाऱ्यांना उमेदवारी दिली जाते. कारागृहातूनही एखादा उमेदवार निवडणूक लढवू शकतो, ही कसली लोकशाही? या सगळ्या सावळ्या गोंधळामुळे राजकारणाची बजबजपुरी झाली असून दुर्दैवाने त्यात महाराष्ट्र बरबटला आहे. महाराष्ट्रातील लोकशाहीला स्थिरत्व कोण मिळवून देणार? हा प्रश्न अनुत्तरितच आहे. मोठमोठे मंत्री म्हणत आहेत, ‘सध्या राजकारणात तत्त्वे राहिलेली नाहीत. केवळ संधीसाधूपणा आला आहे.'' एका प्रसिद्ध दैनिकाच्या संपादकांनी त्यांचे मत व्यक्त करतांना सांगितले, ‘‘सध्याच्या निवडणुकांइतका राजकीय व्यभिचार मी आजवर कधीही पाहिलेला नाही. राजकारणाची शकले आपण कुठल्या पातळीवर नेऊन ठेवणार आहोत?'' ही विधाने केवळ वाचून सर्व जण सोडून देतात किंवा दुर्लक्ष करतात; पण याचा सर्वंकष विचार व्हायला हवा आणि राजकारणातील विकृतता दूर करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे केवळ सत्ता मिळवण्याचे साधन होऊ नयेत, तर त्यांनी लोकांच्या समस्या सोडवण्यास प्राधान्य द्यायला हवे. तो खऱ्या अर्थाने विजय ठरेल. लोकशाहीचा उत्सव साजरा करायचा असेल, तर व्यक्तीगत महत्त्वाकांक्षा किंवा राजकारण यांपेक्षा निर्णयप्रक्रियेत पारदर्शकता आणून सार्वजनिक हिताला प्राधान्य द्यायला हवे, हेच लोकशाहीचे सामर्थ्य आहे. अनेक कार्यकर्ते पुष्कळ वर्षांपासून त्यांच्या पक्षश्रेष्ठींशी एकनिष्ठ आहेत. काहींनी तर त्यांचे संपूर्ण आयुष्य पक्षासाठी वाहून घेतले आहे; पण असे असतांना जर तिकीट नव्याने पक्षात आलेल्यांना मिळत असेल, तर हे कार्यकर्ते खट्टू होणारच! मने दुभंगलेले कार्यकर्ते घेऊन पक्ष विकास कसा साधणार? केवळ खुर्ची आणि सत्ता यांच्या लोभापायी राजकारण कलंकित होतांना दिसत आहे. राजकारणात काहीही मिळवले किंवा संपादन केले जात नाही, तर ते ओरबाडलेच जाते. अशी स्वार्थी मनोवृत्ती घेऊन आदर्श राज्य कसे चालवता येणार? जे नव्याने पक्षात आले आहेत, त्यांचे तरी चारित्र्य चांगले आहे का? याची पडताळणी पक्षांनी केली का? अन्यथा निष्ठावानही गेले आणि कलंकितच पदरी पडले, तर काय उपयोग? भारताला त्यागाची परंपरा लाभलेली आहे. प्रभु श्रीराम, विक्रमादित्य, चंद्रगुप्त, समुद्रगुप्त, हरिहर आणि बुक्क आदी धर्माधिष्ठित राजे होऊन गेले. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आणि पेशवे हेही धर्माधिष्ठित राजे होते. हे सर्व राजे असले, तरी त्यांनी केलेला त्याग महान, स्पृहणीय आणि आदर्शवत आहे. त्यांनी प्रजेचे खऱ्या अर्थाने रक्षण आणि पालनपोषण केले. सीमेवरील सैनिकांच्या त्यागामुळेही भारतीय सुरक्षित आहेत. राजकारणात मात्र त्यागी वृत्ती आणि निःस्वार्थता यांना तिलांजली दिली जात आहे. ‘विरोधक कोण आणि सत्ताधारी कोण?’, हेही कळेनासे झाले आहे. त्यामुळे आता राजकारणालाच तिलांजली देण्याची वेळ आलेली आहे. जनतेने निश्चयच करायला हवा. चांगला उमेदवार निवडून आणणे, हे सर्वस्वी जनता जनार्दनरूपी मतदाराच्या हातात आहे. उमेदवारांच्या गोतावळ्यातून नगराचा विकास साधणारा नेताच निवडून आणावा. पक्षामध्ये न अडकता किंवा त्यांच्या नावांकडे पाहून डोळ्यांची झापडे बंद ठेवून मतदान करू नये. उमेदवारांनी दिलेली आश्वासने किंवा त्यांनी दाखवलेली आमिषे यांना भुलून अयोग्य निवड करण्याचे पाप आपल्या पदरी ओढवून घेऊ नये. ‘लोकांनी लोकांसाठी चालवलेले राज्य’ ही लोकशाहीची व्याख्या आता जनतेनेच सार्थ ठरवावी!

# महाराष्ट्रधर्म टिकवण्याची शेवटची संधी!




मुंबई महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मराठी भाषा, संस्कृती आणि मराठी माणसाच्या हक्कांवर पुन्हा एकदा निर्णायक संघर्ष उभा राहिला आहे. या लेखातून ‘मराठीनामा’च्या निमित्ताने महाराष्ट्रधर्म टिकवण्यासाठीची दिशा स्पष्ट केली आहे.

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत उतरलेले सर्वच प्रमुख दावेदार पक्ष यावेळी, ‘मुंबईचा महापौर मराठीच होणार’ असं स्वतःहून सांगत आहेत. हिंदीसक्तीच्या विरोधात सुरू झालेले मराठी भाषाभिमानी आंदोलन गेले काही महिने क्रमाक्रमाने प्रभावी बनत गेल्याचा हा परिणाम आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व महाराष्ट्र नवनिर्माण सेना हे त्यांच्या जन्मापासूनच मराठीच्या वापराबाबत आग्रही आहेत. त्या पक्षांचा मराठीबाबतचा आग्रह सर्वांना परिचित आहे. शिंदे सेनेला त्यांच्या दिल्लीतील सत्ताधाऱ्यांच्या कृपेने अजूनही न्यायालयीन संरक्षण मिळाले असल्याने, ते जरी स्वतःला शिवसेना म्हणवून घेत असले तरी त्यांची ज्या भारतीय जनता पक्षासोबत युती आहे त्यांच्या तालावरच त्यांना कदमताल करावा लागत आहे आणि लागणार आहे. त्यामुळे जनरेट्यामुळे जरी ते मराठीबाबत बोलत असले तरी अखेर भाजप ठरवणार तेच त्यांना करावे लागणार. भाजप केवळ काँग्रेससारखा राष्ट्रीय पक्ष आहे म्हणून नाही, तर त्यांची जननी असणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला, देशभरात व हिंदू धर्मात असलेली व्यापकता आणि बहुविविधता मान्य नाही. त्यामुळे एक राष्ट्र, एक धर्म, एक भाषा असे म्हणत देशभर हिंदी भाषा प्रचलित करणे हा त्यांच्या सांस्कृतिक राजकारणाचा पाया आहे. त्यामुळे भाजपची भूमिका हिंदीवादीच असणार, हे मुंबईकरांनी लक्षात ठेवावे! भाजपमध्ये मूळ संघ दक्ष नेत्यांपेक्षा सध्या आयारामांचा अधिक बोलबाला आहे. हे बाहेरून आलेले शिलेदार संघ भाजपची भाषा अधिक आक्रमकतेने मांडून आपणच खरे स्वामीभक्त, असे ठसवण्याची संधी साधत असतात. अशा ना. नीलेश राणे वा कृपाशंकर सिंह यांच्या मुखाने संघनीती पेरत राहणे राज्यातील भाजप नेत्यांना सहज सुकर बनले आहे. मुंबईतील मेट्रो बांधणीत राज्य सरकारने कॉर्पोरेट कंपन्यांपुढे लोटांगण घातले. मेट्रो स्थानकांची नावे नक्की करताना मुंबईचा इतिहास, परंपरा, धार्मिक आणि सामाजिक मानबिंदू या सगळ्या बाबी शासनाने सहजपणे गुंडाळून ठेवल्या.

या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र दिनी मराठी अभ्यास केंद्राच्या पुढाकाराने व समविचारी संस्था–संघटनांच्या सहकार्याने राज्य सरकारच्या पहिलीपासून हिंदी सक्ती विरोधातल्या पत्रकार परिषदेने राज्याच्या राजधानीत मराठीचे बिगुल पुन्हा वाजवण्यात आले. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात १०७ हुतात्म्यांची शहादत देत १९६० साली मुंबईसह महाराष्ट्र राज्य मिळवत असताना, मुंबईत मराठीचा एल्गार दुमदुमला होता. मात्र मुंबई महापालिकेत इंग्रजीचाच बोलबाला होता. त्याविरोधात पहिला आवाज उठवला– कर्नाटकातून नोकरीच्या शोधात मुंबईत आलेल्या जॉर्ज फर्नांडिस यांनी! १९६३ साली जॉर्ज महापालिकेत नगरसेवक म्हणून प्रथम निवडून गेले. महापालिकेच्या सभेत त्यावेळी महापौर जेव्हा इंग्रजीत भाषण करू लागले तेव्हा जॉर्ज फर्नांडिस आणि त्यांचे समाजवादी साथी उभे राहून त्यांनी महाराष्ट्र राज्याच्या राजधानीच्या शहरातील महापालिकेत, मराठीतच बोलले पाहिजे, सर्व व्यवहार मराठीतच झाले पाहिजेत, असा आग्रह धरला. त्याच्यानंतर १९६६ साली शिवसेनेचा जन्म झाला. मराठीच्या सन्मानाचा मुद्दा त्यांनी लावून धरला. राजकारणाच्या ओघात पुढे शिवसेना भाजपसोबत गेली व मराठीचा मुद्दा मागे पडला. मुंबईतल्या जमिनी बिल्डरांच्या घशात जाऊ देत मराठी कामगार काम करत असलेल्या गिरण्या आधी बंद झाल्या. मग गिरणी कामगार बेघर झाला आणि मुंबईतून मराठी हद्दपार होण्याच्या कड्यावर येऊन ठेपली. भाषा ही केवळ संवाद माध्यम नसून संस्कृती, परंपरा, आपुलकी आणि बांधिलकीची वाहक असते. देशातील अन्य राज्यात जनतेने आपापल्या भाषांचा वापर सहजभावाने टिकवून ठेवत हे दाखवून दिले आहे. त्यामुळेच मुंबईत मराठी भाषा, शाळा आणि मराठी माणसाच्या हक्कांसाठी सुरू झालेला लढा, महाराष्ट्रधर्मावर आधारित मराठीकरणाकडे जात आहे. आगामी निवडणुकांच्या काळात हा लढा अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी, प्रकाशित करण्यात आलेला पुढील जाहीरनामा फार महत्त्वाचा आहे.

### महानगरपालिकेसाठी मराठीनामा

जाहीरनाम्यात म्हटले आहे की, ‘राजकीय पक्ष आणि धर्म कोणताही असो, मराठी उमेदवारालाच प्राधान्य द्या. जिथे एकापेक्षा जास्त मराठी उमेदवार आहेत तिथे मराठी शाळा, भाषा, मराठी माणूस आणि महाराष्ट्राची संस्कृती याला महत्त्व देणाऱ्या उमेदवाराला प्राधान्य द्या. सार्वजनिक ठिकाणी मराठी नीट बोलू शकणाऱ्या उमेदवारालाच पसंती द्या. निवडणुकीचा प्रचार, प्रसार मराठीतून करणाऱ्या उमेदवारालाच प्राधान्य द्या. स्थलांतरितांसाठी महाराष्ट्राची भाषिक, सांस्कृतिक ओळख पुसून टाकणाऱ्या मराठी/अमराठी उमेदवाराला नाकारा.

महानगरपालिका प्रशासनासंदर्भात मागण्या आहेत, ‘महापौरांसह सर्व समित्यांचे अध्यक्ष मराठीच हवेत. महानगरपालिकेच्या संकेतस्थळासह पालिकेचे सर्व प्रकारचे आर्थिक आणि प्रशासकीय व्यवहार, खरेदी आदेश, पावत्या मराठी भाषेतच उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. महानगरपालिका हद्दीतील दुकानांच्या पाट्या मराठीत नसणाऱ्या दुकानदारांवर कठोर आणि तातडीने दंड वसूल करावा. अंमलबजावणीत हयगय करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. मांसाहारावरून घरे नाकारणाऱ्या संस्थेच्या निवासी इमारती अनधिकृत ठरवून त्यांचे पाणी, वीज तत्काळ कापून टाकावे, तसेच ओसी आणि अग्निरोध प्रतिबंधक प्रमाणपत्र रद्द करावे.

महानगरपालिका हद्दीतील रस्ते, चौक, बागा, क्रीडांगणे, मैदाने यांना मराठी व्यक्ती, मराठी संस्कृती यांच्या प्रतीकांची नावे द्यावीत. महानगरपालिका हद्दीतील मराठी भाषेवरील अन्यायाची तक्रार नोंदविण्यासाठी प्रभागनिहाय ‘मराठी दक्षता केंद्र’ उपलब्ध करून द्यावी. विधिमंडळ राजभाषा समितीच्या धर्तीवर महानगरपालिकेचे कामकाज मराठीतून होते की नाही यावर लक्ष ठेवण्यासाठी मनपा राजभाषा समिती स्थापन करावी. मुंबई शहराचे ‘मराठीपण’ सार्वजनिक ठिकाणी दृश्यमान होईल यासाठी विशेष प्रयत्न करावेत. रस्ते, सार्वजनिक इस्पितळे, वाहतूक व्यवस्था, उद्याने, नाटक व चित्रपटगृहे, सभागृहे इ. ठिकाणी मराठीचा वापर प्राधान्याने व ठळकपणे झाला पाहिजे. अमराठी लोकांना मराठी भाषा शिकविण्यासाठी प्रभागनिहाय ऑफलाइन तसेच ऑनलाइन केंद्रे सुरू करावीत.

### महानगरपालिकेतील संधी आणि प्राधान्य

स्थानिक स्तरावरील रोजगारासंदर्भात मराठीनामा म्हणतो, ‘महापालिकेतील किमान ८० टक्के कंत्राटे मराठी भूमिपुत्र आणि भूमिकन्यांनाच मिळायला हवीत. महापालिकेच्या नोकरभरतीत ८० टक्के प्राधान्य मराठी माध्यमातून शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना मिळायला हवे. फेरीवाला ओळखपत्र देताना ८० टक्के प्राधान्य मराठी भूमिपुत्र आणि भूमिकन्यांनाच मिळायला हवे. महानगरपालिका हद्दीत व्यवसायासाठी परवाना देताना ८० टक्के प्राधान्य मराठी भूमिपुत्र आणि भूमिकन्यांनाच द्यावे. परराज्यीय नागरिकांना व्यवसाय परवाना देताना स्थानिक मराठी भूमिपुत्र आणि भूमिकन्या यांच्या सहभागीदारीची अट घालावी. परराज्यीय नागरिकांना महापालिकेच्या हद्दीत व्यवसाय, धंद्यांसाठी परवाने देताना मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण करणे बंधनकारक करावे.

महानगरपालिकेच्या शाळांकरिता म्हटले आहे की, ‘मराठी माध्यमाच्या अनुदानित व गुणवत्तापूर्ण शाळा चालवणे ही महानगरपालिकेची प्राथमिकता व धोरण असल्याचे कृतीतून सिद्ध करावे. महानगरपालिकेने कोणत्याही परिस्थितीत मराठी वगळता इतर प्रादेशिक भाषांमधील नवीन शाळा काढू नयेत. मराठी शाळांचे शिक्षण मंडळ बदलताना मराठी शाळेचे माध्यम बदलून इंग्रजी माध्यम करू नये. केंद्रीय किंवा आंतरराष्ट्रीय शैक्षणिक मंडळांच्या शाळा फक्त मराठी माध्यमाच्याच काढाव्यात. मराठी शाळांच्या धोकादायक इमारती पाडल्यास तिथे नवीन मराठी शाळाच पूर्ण क्षमतेने उभारली गेली पाहिजे. मराठी शाळांचे अनुदान वेळेवर मिळाले पाहिजे. महानगरपालिकेचा शालेय शिक्षणावर खर्च होणारा निधी हा प्रामुख्याने मराठी शाळांसाठीच असावा.

या निवडणुकीत मुंबई, ठाणे आणि सर्वच महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी आपला मराठी बाणा दाखवून देत या मराठीनाम्याच्या मागे खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. मत देताना यातील मुद्द्यांची काटेकोर आठवण ठेवली पाहिजे. तरच मराठी भाषा, मराठी माणूस आणि महाराष्ट्रधर्म वाचेल. अन्यथा मुंबईत मराठी भाषा आणि मराठी माणूस कधी काळी होते, असे सांगणाऱ्या म्युझियममध्ये त्यांना बसवलेले पाहणे फार दूर नसेल!

# खासगीकरण... बेस्ट उपक्रमाच्या अंगलट



झपाट्याने बदलणाऱ्या मुंबईच्या विकासासोबतच शहरातील रस्ते मृत्यूचे सापळे ठरत असून, बेस्ट बस अपघातांच्या वाढत्या घटनांनी ‘विकास’ आणि ‘सुरक्षितता’ यातील दरी भयावहरीत्या उघडी पडली आहे.

सुरक्षित आरामदायी प्रवास म्हणून बेस्ट बसेसना आजही प्रवासी प्राधान्य देतात. बेस्ट उपक्रमातील कायमस्वरूपी कामगार म्हणजे कधीही बिनधास्त प्रवास करा, अशी बेस्ट उपक्रमाची ओळख. आशिया खंडातील सर्वात दर्जेदार सेवा देणारी म्हणून बेस्ट उपक्रमाची जगभरात ओळख निर्माण झाली आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून बेस्ट उपक्रमात कंत्राटी पद्धतीचा बोलबाला आहे. कंत्राटी पद्धतीवर बसेस नंतर कंत्राटी चालक व वाहक यामुळे बेस्ट उपक्रमाची खासगीकरणाकडे वाटचाल सुरू असल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केला होता. मात्र विरोधकांचा आरोप फेटाळत खासगीकरण नसल्याने बेस्ट उपक्रमाने स्पष्ट केले असले तरी प्रत्यक्षात कंत्राटी पद्धतीवर बेस्ट उपक्रमाचा अंकुश नाही, हे वारंवार सिद्ध होत आहे. बेस्ट उपक्रमात २३ ते २४ हजार कायमस्वरूपी कामगार शिल्लक असून बाकी संपूर्ण कारभार कंत्राटी पद्धतीवर अवलंबून आहे. कुठलीही आस्थापना असो कायमस्वरूपी कामगाराची कामाप्रति जबाबदारी असते आणि काही घडले तर त्याला जाब विचारला जातो. मात्र बेस्ट उपक्रमात एखादी घटना घडली की कंत्राटदार हात वर करतो आणि आरोप बेस्ट उपक्रमावर होतो. त्यामुळे कंत्राटी पद्धत बेस्ट उपक्रमासाठी तापदायक ठरू लागली आहे.

आर्थिक डबघाईस आलेल्या बेस्ट उपक्रमास रुळावर आणण्यासाठी बेस्ट उपक्रमातील माजी सत्ताधारी पक्षाने भाडेतत्त्वावरील बसेस आणण्याचा निर्णय घेतला आणि हळुवार कंत्राटी कामगारांचे वर्चस्व प्रस्थापित होत गेले. कंत्राटी कामगारांचा थेट बेस्ट उपक्रमाबरोबर संवाद नसला, तरी कंत्राटी कामगार मुंबईला वेठीस धरू शकतात, हे अनेकदा केलेल्या आंदोलनावरून स्पष्ट झाले आहे. कंत्राटी कामगारांनी आंदोलनाचे हत्यार उपसले तर कंपनीवर कारवाई करणार, असा इशारा बेस्ट उपक्रमाकडून दिला जातो. मात्र कंत्राटी कामगारांच्या आंदोलनात भरडला जातो तो प्रवासी. कंत्राटी बसचालकांची मनमानी प्रवाशांना नेहमीच अनुभवयास मिळते. बस थांब्यावर बस न थांबवणे, बस थांब्यावर बस आली तर प्रवाशांना बसमध्ये चढण्यास मज्जाव करणे, प्रवाशांबरोबर नाहक हुज्जत घालणे हे प्रवाशांसाठी सवयीचा भाग होत चालला आहे. मात्र प्रवाशांना न जुमाणणारे कंत्राटी चालक बेस्ट उपक्रमाच्या कायमस्वरूपी कामगारांना जुमानत नसल्याची व्यथा अधिकारी वेळोवेळी मांडत आहेत. त्यामुळे बेस्ट उपक्रमाने हक्काच्या कामगारांत वाढ करत स्वतःच्या मालकीच्या बसेस रस्त्यावर उतरवल्या तर ते प्रवासी व उपक्रमास फायद्याचेच ठरेल, याचा विचार उपक्रमाने करणे गरजेचे आहे.

भाडेतत्त्वावरील बसेस घेतेवेळी फक्त चालक कंत्राटदाराचे अशी भूमिका बेस्ट उपक्रमाने घेतली होती. परंतु काळ पुढे सरकत आहे त्याप्रमाणे बेस्ट उपक्रमाच्या भूमिकेतही बदल होत गेला. प्रवाशांना अधिकाधिक सुविधा देण्याच्या नावाखाली आता कंत्राटदाराचाच वाहक व चालक आहे.

कंत्राटी कामगारांमुळे हक्काच्या कामगारांना दुसऱ्या कामाला जुंपण्याची वेळ बेस्ट उपक्रमावर ओढावली आहे. त्यामुळे बेस्ट उपक्रमात कंत्राटदारांचा शिरकाव झाला, हे सध्याची परिस्थिती पाहता कोणी नाकारू शकत नाही. कंत्राटी कामगारांना ज्या काही सोयीसुविधा देणे ही संबंधित कंपनीची जबाबदारी, असे बेस्ट उपक्रमाने याधीच स्पष्ट केले आहे. मात्र कंत्राटी कामगारांनी आंदोलनाचे हत्यार उपसले आणि प्रवाशांना वेठीस धरले तर जास्तीत जास्त कंपनीचे कंत्राट रद्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे. मात्र कंत्राटी कामगारांवर बेस्ट उपक्रमाचे नियंत्रण ठेवण्याचे अधिकार नसल्याने कंत्राटी कामगार आक्रमक झालाच तर मुंबईची दुसरी लाइफलाइन ठप्प होण्यास वेळ लागत नाही. गेल्या काही वर्षांत नियोजनाअभावी बेस्ट उपक्रम आर्थिक कोंडीत सापडला असून प्रवाशांना सुविधा देणे तर दूर कायमस्वरूपी कामगारच समस्यांनी त्रस्त आहेत. बेस्ट उपक्रमातील कायमस्वरूपी कामगारांमुळे ‘बेस्ट’ जिवंत आहे. कामगार टिकला तर बेस्ट टिकेल याचा विचार बेस्ट उपक्रमाने करणे गरजेचे आहे. अन्यथा बेस्ट उपक्रमाचे अस्तित्व धोक्यात येईल, हेही तितकेच खरे.

बेस्ट उपक्रमात खासगी पद्धतीचा शिरकाव झाला, तो प्रवाशांच्या सोयीसाठी नव्हे तर अर्थपूर्ण राजकारणासाठी. बेस्ट उपक्रमात कायमस्वरूपी कामगार आजही कार्यरत आहेत. बेस्ट बसेसवर कायमस्वरूपी चालक व वाहक तर सुरक्षित प्रवास हा विश्वास प्रवाशांमध्ये. मात्र गेल्या १० वर्षांत खासगीकरण झपाट्याने होत असून खासगी कंत्राटदारांच्या बसेस प्रवासी सेवेत आल्यापासून अपघाताचेही प्रमाण वाढले आहे. कंत्राटी चालकांचे वय अधिक, जबाबदारी शून्य, यामुळे कंत्राटी चालक व वाहक कोणालाच जुमानत नाहीत. कंत्राटी चालकाच्या मनमानी कारभारावर बेस्ट उपक्रमाचा अंकुश नाही. त्यामुळे कुठल्या थांब्यावर बस थांबवली नाही तरी कोण विचारणार, बस थांब्यावर न थांबवता पुढे नेऊन थांबवायची, अशी अरेरावी कंत्राटी चालकांची. चालकांच्या याच मनमानी कारभारामुळे अपघाताचे प्रमाण वाढले असून खासगी कंत्राटदारांच्या बसेसचे अपघात होण्याचे प्रमाण अधिक आहे, हेही तितकेच खरे.

बेस्ट परिवहन विभागाच्या ताफ्यात सध्या २,७४४ बसेस आहेत, तर दररोज ३२ लाखांहून अधिक प्रवासी प्रवास करतात. प्रवाशांच्या माध्यमातून बेस्टच्या तिजोरीत रोज कोट्यवधी रुपयांचा महसूल जमा होतो. परंतु १० वर्षांपूर्वी बेस्टच्या ताफ्यात पाच हजार बसेस होत्या आणि ४५ लाख प्रवाशांच्या माध्यमातून रोज ४ कोटी रुपये महसूल जमा होत असे. मात्र कंत्राटी पद्धतीमुळे परिवहन विभागाला उतरती कळा लागली याचा विचार बेस्ट प्रशासनाने करणे गरजेचे आहे, अन्यथा बेस्ट इतिहासजमा होण्यास वेळ लागणार नाही, हेही तितकेच खरे.



# या देशाची काळजी कुणाला आहे?

सध्या राज्यात महानगरपालिकांच्या प्रचाराचा केवळ धुरळाच उडत आहे असे नाही तर वादळ उसळलेले आहे. काही ठिकाणी तब्बल नऊ वर्षांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत असल्यामुळे बऱ्याच वर्षांपासून थांबून राहिलेले इच्छुक अक्षरशः तुटून पडले आहेत. आरोप–प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. इतके पक्ष आणि गट निर्माण झालेले आहेत की, त्यामुळे तुंबळ चढाओढ सुरू आहे. काही राजकीय नेत्यांनी आपले कुटुंबीय आणि जवळचे नातेवाईक यांना तिकिटे देऊन त्यांची सोय लावली आहे. त्यांचा उताविळपणा पाहिल्यावर जणूकाही पुन्हा निवडणुका होणारच नाहीत की, काय असे वाटू लागले आहे.

राजकारणाच्या माध्यमातून जनसेवा केली जात असते, पण जनसेवेसाठी ज्या तुंबळ हाणामाऱ्या सुरू आहेत, काहींचे बळीही जात आहेत, ते पाहिल्यावर हे सगळे जनसेवेसाठी चाललेले आहे की, आपल्या स्वाथार्साठी चालले आहे, असा प्रश्न पडतो. कारण लोकांची सेवा करता करता स्वतः गडगंज श्रीमंत होण्याचा धंदा म्हणजे राजकारण, अशी राजकारणाची अलीकडच्या काळात व्याख्या झाली आहे. जे नेतेमंडळी आता मते मागण्यासाठी लोकांच्या दारोदारी जातात, त्यापैकी जे निवडून येतात, त्यांना लोकांची आता वाटते तशी कळकळ वाटते का? आता लोकांच्या दारोदारी जाणारे जेव्हा निवडून येतात, तेव्हा लोकांना त्यांच्या दारी किती फेऱ्या माराव्या लागतात, याचा अनुभव लोकांना येत असतो. निवडणुकांच्या प्रचाराच्या वेळी उमेदवार ज्या पातळीवर जाऊन एकमेकांवर आरोप करत आहेत, ते पाहिल्यावर आपल्या देशात खरोखर लोकशाही स्वातंत्र्य आहे की, स्वैराचार आहे, असा प्रश्न पडतो. त्यात पुन्हा एकमेकांवर आरोप करणारी मंडळी आपल्या सोयीसाठी पक्ष बदल करून लोकांना तोंडात बोटच नाही तर हात घालायची पाळी आणतात, इतके सारे अनपेक्षित असते.

एमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांनी अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकाचा प्रचार करताना भाजप नेत्या नवनीत राणा यांनी पूर्वी केलेल्या विधानावर तोशेरे ओढले. निवडणूक असल्यामुळे आपल्या बाजूने लोकांची मते ओढण्यासाठी टीका केली जाते. त्या माध्यमातून लोकांच्या मतांचे ध्रुवीकरण केले जाते. उमेदवार हिंदू असेल तर तो हिंदूंची जास्तीत जास्त मते आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न करतो. दुर्सया बाजूला मुस्लीम उमेदवार त्याला पोषक असलेली टीका करून मुस्लिमांची जास्तीत जास्त मते आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न करत असतो. खरे तर अशा विधानांमुळे सामाजिक दुही निर्माण होत असते. खरे तर निवडणुका या सगळ्यांच्या विकासासाठी असतात, त्या काही विशिष्ट पक्षाच्या आणि त्याचे नेते, कार्यकर्ते यांच्या विकासासाठी मर्यादित नसतात.

आपल्या देशात लोकशाही शासन प्रणाली आहे, त्यामुळे एक नागरिक म्हणून आपण निवडणुकांमध्ये सहभागी व्हायला हवे. मुळात कुणाला धर्म किंवा जातीचा आधार घेऊन आवाहन करणे चुकीचे आहे. एक है तो सेफ है, असे जर एखाद्या पक्षातील प्रमुख नेते म्हणत असतील तर हा देश अजून स्वतंत्र झालेला आहे की नाही, अशी शंका येते. कारण ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त झाल्यानंतर आपण सर्व भारतीय म्हणून समान पातळीवर आलेलो आहोत. त्यामुळे निवडणुकांच्या माध्यमातून जेव्हा आपण आपले प्रतिनिधी निवडून देतो तेव्हा एक नागरिक म्हणून सामोरे जायला हवे. त्यावेळी आपल्याला मते मिळवण्यासाठी जाती आणि धमार्चा वापर करावा लागत असेल तर आपण अजून लोकशाहीसाठी परिपक्व झालेलो नाहीत, असाच त्याचा अर्थ आहे.

नवनीत राणा यांनी काही दिवसांपूर्वी एका मौलानांच्या विधानाचा संदर्भ देत हिंदूंनी किमान चार मुलं जन्माला घातली पाहिजेत असे विधान केले होते. त्यांच्या विधानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला होता. याच मुद्द्यावरून ओवेसींनी अमरावतीच्या सभेत राणांवर पलटवार केला. चार नव्हे तर आठ मुले जन्माला घाला, आम्हाला त्याच्याशी काहीही देणेघेणे नाही. अशा वक्तव्यांमुळे जनतेचे लक्ष रोजगार, महागाई आणि नागरी सुविधा यासारख्या मूलभूत प्रश्नांपासून दूर नेले जात असल्याचा आरोप ओवेसी यांनी केला. काही दिवसांपूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनीही लोकांनी कमीत कमी तीन मुले जन्माला घालायला हवीत, असे आवाहन केले होते. त्यापूर्वी विश्व हिंदू परिषदेचे दिवंगत नेते अशोक सिंघल यांनीही हिंदूंनी जास्त मुले जन्माला घालण्याचे आवाहन केले होते.

हिंदूंसाठी हिंदुस्तान आणि मुसलमानांसाठी पाकिस्तान या तत्वावर महमदअली जिनांनी भारताची फाळणी केली होती. पण सगळेच मुसलमान पाकिस्तानात गेले नाहीत, आम्ही इथले कायदेकानून मानून इथे राहू असे त्यांचे म्हणणे होते. पण आज भारतात पाकिस्तानपेक्षाही दुप्पट मुसलमानांची संख्या आहे. त्यातूनच हिंदुत्ववादी नेत्यांमध्ये भय निर्माण होते. त्यामुळेच ते हिंदूंच्या लोकसंख्येचा विषय निवडणुकीत आणून त्याचा हिंदू एकगठ्ठा मते आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न करतात. एका बाजूला म्हणायचे की, भारतीय संविधान धर्मनिरपेक्ष आहे. त्याच वेळी म्हणायचे की, कुटुंब नियोजन करायला आमचा धर्म परवानगी देत नाही. त्यामुळे कुठल्याही धमार्चे राजकीय नेते असूदे, त्यांनी देशाचा विचार करायला हवा. कारण धर्माच्या नावाने तयार झालेल्या पाकिस्तान आणि बांगलादेश यांची आज काय दुर्दक्षा झालेली आहे ते आज आपण पाहत आहोत. धार्मिक शक्तिप्रदर्शनाच्या चढाओढीत देशाची उपेक्षा होता नये.

# चटपटीत मसाला पाव

**साहित्य**- अमूल बटर अर्धी वाटी, दोन मध्यम कांदे बारीक चिरून, दोन मध्यम टोमॅटो बारीक चिरून, दोन टेबलस्पून बारीक चिरलेली हिरवी मिरची, एक टेबलस्पून आलं-लसूण पेस्ट, पाव वाटी बारीक चिरलेली कोथिंबीर, दोन चमचे पाव भाजीचा मसाला, पावभाजीचे पाव, एक चमचा लाल मिरचीचे तिखट, एक चमचा लिंबाचा रस, चवीनुसार मीठ.

**कृती**- तव्यावर अमूल बटर घालून गरम करून घ्या व त्यात बारीक चिरलेला कांदा घालून तो मऊ होईपर्यंत परता. मग त्यात आलं-लसणाची पेस्ट घालून दोन मिनिटे परतून घ्या. नंतर पाव भाजीचा मसाला घालून पुन्हा दोन मिनिटे परता. आता त्यात बारीक चिरलेले टोमॅटो व लाल मिरचीचे तिखट घालून टोमॅटो मऊ होईपर्यंत परता. मग हिरव्या मिरच्यांचे बारीक चिरलेले तुकडे घालून ते कुरकुरीत होईपर्यंत परता आता पावाच्या दोन्ही बाजूला (बाहेरून आणि आतून) बटर लावून दोन्ही बाजू भाजून घ्या.

नंतर आतील बाजूला आपण तयार केलेला मसाला सगळीकडे पसरून लावा. मसाला लावलेला पाव तव्यावर ठेवून डावाने सारखा दाबत राहून हलका भाजून घ्या. याच पद्धतीने सगळे पाव मसाल्याचे तयार करून घ्या. गरम मसाला पाव पुदिन्याच्या चटणी सोबत सर्व्ह करा.



# चेहरा आरोग्याचा आरसा

**आपली त्वचा हा आपल्या आरोग्याचा आरसा असतो. त्यातल्या त्यात चेहऱ्याची त्वचा आपले आरोग्य कसे आहे हे दर्शवीत असते. जुन्या काळातील आयुर्वेदासारख्या सगळ्या जुन्या उपचार पध्दतींनी ही गोष्ट मान्य केलेली आहे. चीनमध्ये लोकप्रिय असलेल्या ॲक्युपंक्चर किंवा ॲक्युप्रेशर अशा जुन्या उपचार पध्दतीत सुध्दा चेहरा बघून आरोग्याचे निदान केले जाते.**

**आयुर्वेदामध्ये** जशी नाडी परीक्षा आहे. तेवढी ही चेहऱ्याची परीक्षा शास्त्रशुध्द आणि नेमकी नाही. परंतु आरोग्याच्या काही तक्रारींचा अंदाज चेहऱ्याच्या त्वचेवरून येतो असे अनेक अनुभवी डॉक्टर आणि वैद्यांचे म्हणणे आहे. आपल्या शरीरातल्या अवयवांमध्ये जे काही घडते त्याची प्रतिक्रिया चेहऱ्यावर उमटते आणि चेहऱ्यावरून जे दिसते त्याचाच विस्तार शरीरातल्या अवयवांमध्ये झालेला असतो असे चिनी लोक मानतात.

आधुनिक काळातले त्वचारोग तज्ञ देखील त्वचेवरच्या विविध डागांवरून रुग्णाच्या कोणत्या अवयवात काय बदल झालेले आहेत हे हेरता येते असे मान्य करत आहेत. काही डॉक्टरांनी तर चेहऱ्यावरचा कोणता बदल शरीरातल्या कोणत्या दोषाचा द्योतक आहे याचे काही ठोकताळे बसवलेले आहेत. तोंडामध्ये होणारे बदल किंवा दिसणारे दोष हे पोटातल्या विकाराचे द्योतक असतात. अपचन झालेल्या रुग्णाच्या तोंडाला दुर्गंध येतो. पोटातल्या काही विकारांचे प्रतिबिंब तोंड येण्यात उमटत असते. मूत्रपिंड आणि मूत्राशय यात काही दोष असतील तर ते दोष हनुवटीवर उमटतात. त्याच बरोबर लिव्हरमध्ये काही दोष असेल तर पापण्यामध्ये बदल होतात. काही लोकांना या गोष्टी मान्य नाहीत परंतु शेवटी हे ठोकताळे आहेत.





काही लोकांच्या चेहऱ्यावर मानेच्या मागे त्वचा ङ्क्किट पडायला लागते तेव्हा काही विशिष्ट आजार बळावत असतात. काही लोकांच्या चेहऱ्यावरच्या काही बदलांतून अनेक डॉक्टरांना तो मधुमेहाला बळी पडण्याची शक्यता लक्षात येते. चेहऱ्यातले काही बदल विशेषतः कानाच्या मागचे बदल हे रुग्ण ज्यादा अन्न प्राशन करत असल्यचे द्योतक असते असे काही डॉक्टरांच्या लक्षात आले आहे.

सतत पैशाच्या मागे लागणारे लोक, दारू पिणारे लोक, रक्तदाब वाढलेले लोक चेहऱ्यावरून सरळ सरळ ओळखू येतात मात्र त्यासाठी अनुभवी नजर लागते.

# पपई खाण्याचे १० आरोग्यदायी फायदे!

**चवीला गोड, शरीराला पोषक आणि त्वचेचे आरोग्य सुधारणारे फळ म्हणजे पपई! पपई शरीराला गरम असल्याने वातावरणात गारवा असताना खाणे हितकारी आहे. तसेच पपई खाण्याचे आणखी दहा फायदेदेखील आहेत....**

▮ **शरीरातील कोलेस्टेरॉल कमी करते**- पपईमध्ये व्हिटामिन सी व फायबरचे प्रमाण अधिक असल्याने रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्टेरॉल साचून राहण्यापासून बचाव होतो. रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्टेरॉल साचून राहिल्याने ह्यदविकाराचा धोका संभवतो.

▮ **वजन घटवण्यास मदत होते**- एका मध्यम आकाराच्या पपईमध्ये 120 कॅलेरीज असतात. त्यामुळे जर तुम्ही वजन घटवण्याच्या विचारात असाल तर पपईचा आहारात नियमित समावेश करा. पपईतील डायटरी फायबर्समुळे वेळी-अवेळी लागणाऱ्या भूकेवर नियंत्रण मिळवणे शक्य होते.

▮ **रोगप्रतिकारशक्ती वाढते**- आजारांशी सक्षमतेने सामना करण्यासाठी तुमची रोगप्रतिकारशक्ती मजबूत असणे फार गरजेचे आहे. तसेच शरीरातील व्हिटामिन सीच्या गरजेपेक्षा 200% अधिक व्हिटामिन सी केवळ पपईमुळे मिळू शकते.

▮ **मधुमेहींसाठी गुणकारी**- पपई चवीला गोड असली तरीही त्यामुळे रक्तातील साखर वाढत नाही. कपभर पपईच्या तुकड्यांमधून केवळ 8.3 ग्रॅम साखर असते. यामुळे मधुमेहींनी पपई खाणे हितकारी आहे. तसेच पपई खाल्ल्याने मधुमेह जडण्यापासून बचाव होतो.

▮ **डोळ्यांचे आरोग्य सुधारते**- पपईमध्ये व्हिटमिन ए मुबलक प्रमाणात आढळते. डोळ्यांचे आरोग्य राखण्यासाठी व्हिटामिन ए अत्यंत गरजेचे आहे. वाढत्या वयानुसार दृष्टी कमी होण्याची शक्यता असते. या समस्येपासून बचावण्यासाठी पपईचा आहारात समावेश करावा.

▮ **सांधेदुखीपासून आराम मिळतो**- पपईमध्ये व्हिटामिन सी प्रमाणेच वेदनाशामक गुणधर्म असल्याने सांधेदुखीच्या रुग्णांना पपईचे सेवन फारच हितकारी आहे. पपईतील व्हिटामीन सी घटक सांध्यांना मजबुती देण्यास तसेच सूज कमी करण्यास मदत करतात.

▮ **पचन सुधारते**- आजकालच्या व्यस्त जीवनशैलीमुळे जंक फूड किंवा बाहेरचे जेवण टाळणे हे काहीसे कठीण आहे. त्यामुळे अशा खाण्याने पचनशक्ती बिघडण्याची शक्यता असते. अशावेळी पपई खाल्ल्याने अरबट-चरबट खाल्ल्याने होणारे दुष्परिणाम टाळण्यास मदत होते. पपईतील पपैन नामक एंजाईम पचन कार्य सुधारते.

▮ **मासिक पाळीचा त्रास कमी होतो**- अनियमित मासिक पाळी तसेच मासिक पाळीच्या काळातील त्रास अशा समस्या दूर करण्यासाठी पपई फारच उपयुक्त आहे.

▮ **कर्करोगापासून बचाव होतो**- पपईमधील ॲन्टीऑक्सिडंट घटक शरीरातील फ्री रॅडीकल्सपासून तुमचा बचाव करते. तसेच पपईतील बीटा कॅरोटीन आतड्यांच्या कर्करोगापासून बचाव करते.

▮ **ताण-तणाव कमी होतो** - दिवसभराच्या धावपळीनंतर वाटीभर पपईचे काप खाल्ल्यास थकवा कमी होण्यास मदत होते. तसेच व्हिटामिन सी शरीरातील हार्मोन्सचे प्रमाण संतुलित राखते.



# आता डेस्कटॉपवरून करा व्हॉट्सॲप व्हिडिओ आणि ऑडियो कॉल

**व्हॉट्सॲप कंपनी आपल्या यूजर्ससाठी नेहमीच नवीन फीचर्स आणते. आता कंपनी नवीन फीचर्स वर काम करीत आहे. व्हॉट्सॲप यूजर्सला आता डेस्कटॉपवरून सुद्धा कॉल करता येणार आहेत. या कॉलमध्ये ऑडियो आणि व्हिडिओचा समावेश असेल.**



**व्हॉट्सॲप** ने डेस्कटॉपसाठी अनेक फीचर्स आणले आहेत. परंतु, दोन फीचर्सची कमतरता अजूनही जाणवत आहे. पहिले आहे डेस्कटॉप वर व्हॉट्सॲप कॉल करणे आणि दुसरे डेस्कटॉपवर व्हिडिओ किंवा किंवा ऑडियो करणे. यातील एका फीचरची कमतरता आता जाणवणार नाही. खरं म्हणजे व्हॉट्सॲप ने विंडोजसाठी एक नवीन ॲप आणला आहे. हा ॲप वेगाने लोड होते. तसेच सहज इंटरफेस सोबत येते. याच्या मदतीने व्हॉट्सॲप आपल्या यूजर्सला जास्तीत जास्त ८ लोकांसोबत ग्रुप व्हिडिओ कॉल आणि ३२ लोकांसोबत ऑडियो कॉल करण्याची सुविधा देते.

**मैक ओएस ला ही सुविधा मिळणार**

समोर आलेल्या माहितीनुसार, फक्त विंडोजचा यात समावेश करण्यात आला आहे. परंतु, हे फीचर मॅकबॅकच्या यूजर्ससाठी उपलब्ध केले जाणार आहे. कारण, सध्या मॅक डेस्कटॉप व्हर्जन बीटा टेस्टिंग मध्ये आहे. नुकत्याच एका ब्लॉग पोस्टमध्ये मेटाने म्हटले की, विंडोजच्या इंस्टेंट मेसेजिंग ॲप व्हॉट्सॲपला नवीन फीचर्स सोबत एक नवीन लूक मिळाले आहे. मेटाने म्हटले की, आम्ही विंडोजसाठी एक नवीन व्हॉट्सॲप ॲप आणले जात आहे. जे वेगाने लोड होईल. या ॲप सोबत मोबाइल व्हर्जनच्या सारखे इंटरफेस सोबत येईल.

**डेस्कटॉपवर व्हॉट्सॲप कॉल कसा कराल?**

डेस्कटॉपवर व्हॉट्सॲप च्या माध्यमातून व्हिडिओ किंवा ऑडियो कॉल करण्याची सुविधा अपडेट सोबत उपलब्ध आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी तुम्हाला डेस्कटॉप व्हॉट्सॲप ॲपला अपडेट करावे लागणार आहे. अपडेट करण्यात आल्यानंतर तुम्हाला मोबाइल इंटरफेस प्रमाणे व्हिडिओ कॉल आणि ऑडियो कॉलचे आयकॉन दिसेल.



# पोळीला तूप लावून खाणे आरोग्यास लाभदायक

**हेल्दी** राहण्यासाठी शरीरास सकस आहाराची फार गरज असते. आताच्या काळात सर्वांना फास्ट फूड जास्त आवडतात, त्यामुळे रोजच्या आहाराकडे दुर्लक्ष होते. फास्ट फूड आणि तेलकट पदार्थ आरोग्यास घातक असतात. कित्येक लोक पोळ्या बनवण्यासाठी तेल किंवा डालड्याचा उपयोग करतात. तर पोळ्या बनवण्यासाठी तूपाचा वापर शरीरास अधिक लाभदायक आहे. तूपामध्ये अनेक प्रकारचे पोषक तत्वे असतात. तुम्हाला वाटत असेल, तूप खाल्याने वजन वाढतं तर हा एक गैरसमज आहे.

▮ वजन कमी करण्यासाठी तूपाची मदत होते.

▮ तूप आपल्या शरीरातील मेटाबॉलिज्म वाढवण्यास मदत करतो. त्यामुळे वजन कमी करण्यास मदत होते.

**त्वचेसाठी लाभदायक तूप**

तूपामध्ये एन्टीऑक्सीडेंट घटक असतात ते त्वचेसाठी फार फायदेशीर असतात. त्याचप्रमाणे त्वचेमध्ये असलेले डेड सेल्स तूपाच्या नियमित सेवनाने नष्ट होतात.

# उच्च रक्तदाब नियंत्रणासाठी सोप्या टीप्स



**संशोधनात** असे आढळून आले आहे की, दहामधून सात तरुणांना ब्लडप्रेशर जास्त असल्यामुळे हार्ट ॲटॅक किंवा स्ट्रोक येण्याची शक्यता जास्त असते. झोप कमी होणे, स्ट्रेस, डिप्रेशन, जास्त मीठ असलेले फास्ट फूड आणि डेस्क जॉब ही याची मुख्य कारणे आहेत. म्हणून...

▮ आठवड्यातून ३-४ दिवस कमीत कमी २० मिनिटे जॉगिंग करावी. जॉगिंग केल्याने ऑक्सिजन घेण्याच्या प्रक्रियेत सुधारणा होते आणि ब्लडप्रेशर नियंत्रित राहतो.

▮ रोज कमीत कमी ३० मिनिटांचे ब्रिस्क वॉक करावे.

▮ एरोबिक केल्याने हाय ब्लडप्रेशर कमी होते.

▮ तणावरहित राहण्यासाठी प्राणायाम, कपालभाती करावे.

# चमकदार त्वचेसाठी हे स्क्रब वापरून बघा

**आपल्या चेहऱ्यावरील चमक हळूहळू कमी होत आहे, तर काळजी करू नका. आम्ही आपल्याला काही घरगुती स्क्रबबद्दल सांगत आहोत ज्यांना वापरून आपण आपल्या चेहऱ्यावरील चमक परत मिळवू शकता. चला तर मग वेळ न गमावता जाणून घेऊया की, आपण घरगुती स्क्रब कसा तयार करू शकता...**

**साखर आणि लिंबू** - एक चमचा साखर घेऊन त्यामध्ये अर्धा चमचा लिंबाचा रस मिसळा. आता हळुवार हाताने याला आपल्या चेहऱ्यावर लावा आणि काही वेळ स्क्रब करून आपला चेहरा स्वच्छ धुवा.

**संत्र्याच्या सालीचे स्क्रब** - संत्र्याची साल आपल्या त्वचेला तजेलपणा आणण्यासाठी उपयुक्त आहे. यासाठी आपल्याला संत्र्याच्या सालीला वाळवून वाटून भुकटी करायची आहे. या भुकटीमध्ये थोडेसे कच्चे दूध मिसळून आपण चेहऱ्यावर लावू शकता. संत्र्याच्या सालाची भुकटी किंवा पावडर चांगले स्क्रब म्हणून काम करतं.

**तांदळाच्या पिठाचे स्क्रब** - तांदळाचे पीठ आणि दही सम प्रमाणात मिसळून घ्या. आता हे चेहऱ्यावर लावून हळुवार हाताने मालिश करा आणि काही वेळ तसेच ठेवून नंतर स्वच्छ पाण्याने धुऊन घ्या.

**बेकिंग सोडा स्क्रब** - घरच्या घरी आपला चेहरा उजळवायचा असल्यास २ मोठे चमचे बेकिंग सोडा, १ लहान चमचा दालचिनी पूड, अर्धा लिंबाचा रस आणि मध मिसळा. या पेस्टला आपल्या त्वचेवर ५ मिनिटे लावा. लक्षात ठेवा की या पेस्टचा वापर आठवड्यातून दोन वेळापेक्षा जास्त करू नये.





# पेरूची पानेदेखील उपयुक्त असतात, नक्की वाचा याचे फायदे

पेरू औषधी गुणधर्मांने समृद्ध आहे. याच्या सेवनाने बरेच आरोग्यदायी फायदे मिळतात. उलट्या रोखण्यासाठी पेरू फायदेशीर आहे तसेच हृदयरोगापासूनदेखील बचाव होतो. तसे तर हे भारतात मिळणारे एक साधे फळ आहे, ज्याचे प्राचीन संस्कृत नाव अमृत किंवा अमृत फळ आहे. वाराणसीमध्ये याला लोक अमृत नावानेच संबोधित करतात. पेरूप्रमाणेच त्याची पानेदेखील खूप उपयुक्त असतात. यामध्ये अँटी ऑक्सिडन्ट, अँटी बॅक्टेरियल आणि अँटी इन्फ्लमेन्टरी गुणधर्म असतात, जे आपले अनेक आजारांपासून संरक्षण करतात. चला जाणून घेऊया पेरूच्या पानाचे फायदे.

पोटदुखी आणि उलट्यामध्ये आराम देतो : पेरूच्या पानात अँटी बॅक्टेरियल गुणधर्म असतात, याच्या पानाच्या पाण्याचे सेवन केल्याने आपल्या पोटाचे दुखणे दूर होऊ शकते. तसेच उलट्यापासून देखील आराम मिळतो. यासाठी पेरूच्या ५-६ पानांना १० मिनिटे उकळवून घ्या आणि नंतर गाळून त्याचे पाणी प्या.

सांधेदुखीचा त्रास दूर होतो : सांधेदुखीमध्येदेखील पेरूची पाने फायदेशीर आहेत. यासाठी आपण पेरूची पाने वाटून त्याचा लेप बनवा आणि त्या लेपाला सांध्यावर लावा, यामुळे आपल्याला वेदनेपासून आराम मिळेल.

मधुमेहातदेखील फायदेशीर : पेरूची पाने पाण्यात टाकून प्यायल्याने हे मधुमेहासाठी फायदेशीर मानले जाते. वास्तविक हे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित करतं. याशिवाय हे शरीरातील जटिल स्टार्च साखरेमध्ये बदलण्यापासून रोखते, ज्यामुळे वजन कमी करण्यास मदत होते.

दातदुखी, हिरड्यांची सूज कमी करते : पेरूच्या पानाचे पाणी दात दुखणे, हिरड्यांची सूज आणि तोंड येण्यापासून आराम देण्याचे काम करते. यासाठी पाने उकळवून त्या पाण्याने गुळण्या करा. असे केल्यास आपल्याला आराम मिळेल.

# उपाशीपोटी लसूण खाण्याचे फायदे

**बद्धकोष्ठता आणि गॅसच्या त्रासापासून मुक्ती मिळवण्यासाठी लसूण एक चमत्कारी औषध ठरेल. आयुर्वेदात लसूण हे चमत्कारिक गुणधर्म असलेले औषध म्हणून वर्णिले आहे, याचे बरेच फायदे आहेत. हे फक्त जेवण्याची चवच वाढवत नाही, तर शरीरास निरोगी ठेवण्यासदेखील मदत करते. याच कारणामुळे बऱ्याच घरगुती उपचारांमध्ये लसणाचा वापर केला जातो.**



**वास्तविक** लसणामध्ये अनेक प्रकारच्या पोषक घटकांचा समावेश आहे. यामध्ये कॅल्शियम ते तांबे, पोटॅशियम, फॉस्फरस, आयर्न आणि व्हिटॅमिन ई १ इत्यादींचा समावेश आहे. आपण लसणाचा वापर कोणत्याही प्रकारे करू शकतो. ते फायदेशीर आहेच; पण उपाशीपोटी खाल्ल्याने हे खूप फायदेशीर आहे. चला उपाशीपोटी याच्या सेवनाचे फायदे जाणून घेऊया.

**रोगप्रतिकारशक्ती मजबूत करतं** -

लसणाला प्रतिकारकशक्ती बळकट करण्यासाठी प्रभावी मानले आहे. अभ्यासात आढळून आले आहे की जे लोक दररोज लसणाचे सेवन करतात, त्यांना इतर लोकांपेक्षा सर्दी-पडसे कमी होते. सकाळी उपाशीपोटी त्याचे सेवन करणं जास्त फायदेशीर आहे.

**उच्च रक्तदाब असल्यास फायदेशीर** -

ज्या लोकांना उच्च रक्तदाबाची समस्या आहे, त्यांनी दररोज उपाशीपोटी लसणाचे सेवन करावे, कारण यामध्ये रक्तदाब नियंत्रित करण्याचे गुणधर्म आढळतात. लसूण चावून खाल्ल्याने उच्च रक्तदाबात आराम मिळतो.

**हृदयाचा धोका कमी होतो** -

लसूण हृदयरोगाच्या धोक्याला कमी करतं. जर हृदयाच्या रोगापासून वाचायचे असल्यास दररोज सकाळी लसणाचे सेवन करावे. मधासहदेखील लसणाचा सेवन करू शकतो. यामुळे रक्ताभिसरण योग्य राहते.

**पोटाशी निगडित त्रासापासून सुटका** -

दररोज उपाशीपोटी लसणाचे सेवन केल्यास पोटाशी निगडित त्रास जसे की बद्धकोष्ठता आणि गॅसपासून आराम मिळू शकतो. यामुळे पाचक प्रणालीदेखील चांगली राहील. जे लोक ॲसिडिटीच्या त्रासामुळे त्रस्त झाले आहेत, त्यांना भाजके लसूण खाण्याचा सल्ला दिला जातो.

# वजन कमी करण्यासाठी दिवसाला किती पोळ्या खाव्यात?

**आपल्या दररोजच्या कॅलरीच्या प्रमाणाला लक्षात घेता पोळी किंवा भाकरीचे सेवन करावे. यामुळे आपल्या वाढत्या वजनाला कमी करण्यास मदत मिळेल. वजन कमी करण्यासाठी लोक आपल्या आहाराची काळजी घेतात. वास्तविक शरीरातील अतिरिक्त चरबी कमी करण्यासाठी कार्बोहायड्रेट घेणे टाळावे लागते. कार्बोहायड्रेटमुळे वजन झपाट्याने वाढते. पण कार्बोहायड्रेट हे आवश्यक मायक्रोन्यूट्रिएंट आहे, ज्याला वगळून चालणार नाही.**



भारतातील आहाराबद्दल बोलायचे झाल्यास पोळी आणि भात हे कार्बोहायड्रेटचे चांगले स्रोत आहेत. जवळजवळ प्रत्येक घरात भात आणि पोळ्या नियमितपणे लोक खातात. परंतु जेव्हा वेळ येते वजन कमी करण्याची, तेव्हा लोकांना हे जाणून घ्यायचे असते की, दररोज किती पोळ्या खाव्या, जेणेकरून वजन वाढणार नाही. चला तर मग जाणून घ्या -

**गव्हामध्ये पौष्टिक घटक आढळतात :**

पोळ्यांमध्ये फक्त कार्बोहायड्रेटचं नव्हे तर इतर आवश्यक पोषक घटक देखील आढळतात. गहू हा प्रथिने, फॅट, फॉस्फरस, मॅग्नेशियम, फॉलेट आणि लोहाचा सर्वात चांगला स्रोत आहे. पोळी किंवा चपाती खाल्ल्याने शरीरास सर्व पोषक घटक मिळतात.

**दिवसात किती पोळ्या किंवा भाकऱ्या खाव्या?**

कार्बोहायड्रेट, प्रथिनं आणि फॅट किंवा चरबीला मायक्रोन्यूट्रिएंट म्हणतात. शरीरातील विविध कार्ये करण्यासाठी आपल्या शरीरास यांची गरज पडते. सर्वप्रथम आपल्याला हे ठरवावे लागणार की आपल्याला दररोज किती प्रमाणात कार्बोहायड्रेट घ्यायचे आहे. त्यानुसारच आपण दिवसाचा पोळीचा किंवा भाकरीचा आहार ठरवावा. ६ इंचाच्या लहान पोळीमध्ये ७१ कॅलरी आढळते. आपण दुपारच्या जेवणात ३०० कॅलरी घेतो, तर आपण दोन पोळ्या खाऊ शकतो. यापासून आपल्याला १४० कॅलरीज मिळतात आणि बाकीच्या कॅलरी आपल्याला सॅलड आणि भाज्यांपासून मिळते. लक्षात ठेवा की पोळीशिवाय आपण ज्या भाज्या आणि फळ घेत आहात त्यांच्यामध्ये देखील कार्बोहायड्रेट आढळते. म्हणून आपल्या कॅलरीच्या सेवन करण्यावरच हे अवलंबून आहे की आपल्याला दिवसात किती पोळ्या खायला हव्या. दिवसातून चार पोळ्या खाणे वजन कमी करण्यासाठी चांगले मानले जाते.

**पोळीचे इतर पर्याय :**

जर आपण वजन कमी करण्यासाठी प्रयत्नरत आहात, तर आपण गव्हाच्या पोळीव्यतिरिक्त ज्वारीची किंवा बाजरीची भाकरी देखील खाऊ शकता. या भाकऱ्या गव्हाच्या पोळीपेक्षा आरोग्यवर्धक असतात आणि यामध्ये कार्बोहायड्रेट कमी तर इतर पोषक घटक मुबलक प्रमाणात असतात.

**हे लक्षात घ्या :**

आहारात फक्त कार्बोहायड्रेटचे प्रमाण कमी केल्याने वजन कमी होत नाही. यासाठी आपल्याला इतर गोष्टी जशा की आपली जीवनशैली, झोपण्याची पद्धत आणि नियमितपणे व्यायामाची दिनचर्या या गोष्टी देखील आवश्यक आहेत. निरोगी आणि संतुलित आहारासह या गोष्टीकडे लक्ष द्यायला हवं.

# किचन स्वच्छ ठेवण्यासाठी काही टीप्स

**दररोज नोकरी किंवा व्यवसायामुळे आपल्याला आपल्या कामामधून वेळ मिळत नाही. अशा वेळी आपल्याला दररोज किचन साफ करणे जमत नाही. त्यामुळे ज्या गृहिणी कामामध्ये व्यस्त असतात, अशा गृहिणींसाठी काही खास टीप्स...**

▮ **डायनिंग टेबल** : डायनिंग टेबल हे दररोजच्या जेवणामुळे घाण झालेले असते. त्यामुळे डायनिंग टेबलला स्वच्छ करण्यासाठी नीलगिरीच्या तेलाचा वापर करू शकता. टेबलमधून दुर्गंधी येत असल्यास एखाद्या कापडावर नीलगिरी तेलाचे काही थेंब टाकून त्याने पुसून घ्या. ▮ **फ्रीज**: फ्रीजचे दार उकडलेल्या बटाट्याच्या सालींनी स्वच्छ केले जाऊ शकते. ▮ **नळ** : किचनमधील नळ चकचकीत करण्यासाठी त्यावर थोडीशी टूथपेस्ट लावा आणि गरम पाण्याने धुऊन टाका. ▮ **कचऱ्याचा डबा** : किचनमध्ये जिथे कचऱ्याचा डबा ठेवतो, ती जागा नियमितपणे फिनेल टाकून स्वच्छ करावी. कारण सर्वात जास्त घाण त्या जागेवर जमते. त्यामुळे बॅक्टेरिया पसरतात. किचनमध्ये नेहमी झाकण असलेले कचऱ्याचे डबे वापरा. ▮ **मिक्सर** : मिक्सर वापरताना तो वापरून झाल्यावर त्यावरील घाण साफ करून त्याला कव्हर घालून ठेवा. त्यामुळे त्यावर धूळ जमा होत नाही. ▮ **स्टोव्ह** : स्टोव्ह स्वच्छ करण्यासाठी संत्र्याचे साल वापरा. त्याने स्टोव्हला रॉकेलचा जास्त वास येत नाही.



# आगामी महानगरपालिका निवडणुकीत ४ वेळा ईव्हीएमचं बटण दाबावं लागणार

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

यावेळी महानगरपालिका निवडणुकीत मतदान करताना थोडा बदल दिसणार आहे. कारण यंदाच्या निवडणुका बहुसदस्य पद्धतीने होणार आहेत. म्हणजे नेमकं काय तर या पद्धतीत एकाच प्रभागात एकाऐवजी चार जागा असतील. म्हणजेच, त्या एका प्रभागातून चार नगरसेवक निवडले जाणार आहेत. यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता उर्वरित २८ महानगरपालिकांचा समावेश आहे. या पद्धतीत एकाच प्रभागात एकाऐवजी चार जागा असतील. म्हणजेच, त्या एका प्रभागातून चार नगरसेवक निवडले जाणार आहेत. याचा थेट परिणाम मतदान प्रक्रियेवर होणार आहे. कारण, जेव्हा एका प्रभागात चार जागा असतात, तेव्हा मतदाराला त्या चारही जागांसाठी मतदान करणं आवश्यक असतं. त्यामुळेच यावेळी मतदाराला चार वेळा मतदान करावं लागणार आहे.



**मतदानाची प्रक्रिया नेमकी कशी असणार आहे, हे समजून घेऊया...**

प्रत्येक मतदान केंद्रावर त्या-त्या प्रभागातील जागांच्या संख्येनुसार दोन किंवा चार ईव्हीएम मशीन ठेवण्यात येणार आहेत. या मशीनद्वारे मतदार चारही जागांसाठी स्वतंत्रपणे मतदान करू शकणार आहे. उदाहरणार्थ, समजा एखाद्या प्रभागात अ, ब, क आणि ड अशा चार जागा आहेत. तर त्या प्रभागातील मतदाराने अ जागेसाठी एक मत, ब जागेसाठी एक मत, क जागेसाठी एक मत आणि ड जागेसाठी एक मत देणं बंधनकारक असेल. या चारही जागांसाठी मत दिलं, तरच मतदाराचं मतदान पूर्ण आणि वैध समजलं जाईल.

मतदान करताना मतदारांना उमेदवार ओळखण्यात अडचण येऊ नये, यासाठी ईव्हीएम मशीनवर विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. प्रत्येक जागेसाठी उमेदवारांची नावे वेगवेगळ्या रंगांमध्ये दाखवली जातील. अ जागेसाठी पांढरा रंग वापरण्यात येईल. ब जागेसाठी फिकट गुलाबी रंग असेल. क जागेसाठी पिवळा रंग असेल. आणि ड जागेसाठी फिकट निळा रंग असेल. या रंगांमुळे मतदाराला कोणत्या जागेसाठी तो मतदान करत आहे, हे स्पष्टपणे समजणार आहे आणि चुकीचं मतदान होण्यापासून वाचवणार आहे.

त्याचबरोबर इथे एक अतिशय महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवणं आवश्यक आहे. चारही जागांसाठी मतदान करणं अनिवार्य असलं, तरी चारही मतं एकाच पक्षालाच द्यावी लागतील, असा कोणताही नियम नाही. मतदाराला पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आलं आहे. मतदार अ जागेसाठी एका पक्षाच्या उमेदवाराला मत देऊ शकतो, ब जागेसाठी दुसऱ्या पक्षाच्या उमेदवाराला मत देऊ शकतो, क जागेसाठी तिसऱ्या पक्षाला तर ड जागेसाठी चौथ्या वेगळ्या पक्षाच्या उमेदवारालाही मत देऊ शकतो. मात्र, जर मतदाराने चारपैकी एकही मत दिलं नाही, तर त्याचं संपूर्ण मतदान अवैध ठरणार आहे. म्हणजेच, तीन मतं दिली आणि एक मत राहिलं, तरीही ते मतदान ग्राह्य धरलं जाणार नाही.

मतदान करताना जेव्हा मतदार चारही जागांसाठी योग्य उमेदवाराचं बटण दाबतो, तेव्हा ईव्हीएम मशीन बीप आवाज देते. हा आवाज आला, तरच मतदान यशस्वी झालं, असं समजायचं आहे. म्हणूनच, मतदान करताना घाई न करता, प्रत्येक जागेसाठी मत दिलं आहे का, हे नीट तपासणं गरजेचं आहे.

थोडक्यात सांगायचं झालं, तर यावेळी महानगरपालिका निवडणुकीत एक प्रभाग, चार जागा, आणि चार वेळा मतदान हे चित्र असणार आहे. त्यामुळे, मतदान करताना चारही जागांसाठी मत द्याल, तेव्हाच तुमचं मतदान पूर्ण आणि अवैध ठरेल.

# तब्बल ११४ उमेदवार अब्जाधीश!

## बहुसंख्य उमेदवार उपमुख्यमंत्री शिंदेंच्या शिवसेनेतील




■ठाणे। प्रतिनिधी,

ठाणे महानगरपालिका निवडणूक लढवणारे ठाण्यातील काही उमेदवार अब्जाधीश असल्याचे स्पष्ट झाले आहे. १५ जानेवारी, रोजी ठाणे महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक पार पडणार आहे. दरम्यान या निवडणुकीत ६४९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यापैकी तब्बल ११४ उमेदवार हे अब्जाधीश असल्याचे कळते. या उमेदवारांपैकी बहुसंख्य उमेदवार एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेतले आहेत.

या पार्श्वभूमीवर मिळालेल्या माहितीनुसार या संबंधित उमेदवारांपैकी एका उमेदवाराचे एकूण उत्पन्न ३८१ कोटींचे आहे. अशी नोंद त्या उमेदवाराच्या शपथपत्रात आढळली आहे. तसेच, या उमेदवारांना वगळता ठाणे महानगरपालिकेच्या सर्वात कमी उत्पन्न असलेले उमेदवार हे मुंब्रा भागातले असल्याचे ठरते आहे. यात एका उमेदवाराचे उत्पन्न अवघे २० हजार ५०२ रुपये इतपत असल्याचे स्पष्ट झाले आहे. ठाण्यातील महानगर पालिकेची निवडणुकीसाठी अनेक उमेदवार रिंगणात आहेत. अब्जाधीश असलेले बहुतांश उमेदवार एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेतले आहेत. तसेच भाजप, राष्ट्रवादी शरद पवार गट, राष्ट्रवादी अजित पवार गट, ठाकरेंच्या शिवसेनेतले आणि काही मनसेचे उमेदवारही गडगंज श्रीमंत आहेत.

या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या एका उमेदवाराचे सर्वाधिक उत्पन्न दिसून आल्यानंतर आता शिंदेंच्या सेनेतील आणखी एका उमेदवाराच्या प्रतिज्ञापत्रात त्याची एकूण मालमत्ता १२६ कोटी ६६ लाख असल्याचे कळते आहे. तसेच कळवा येतील एका शिंदेंच्या उमेदवाराची १०५ कोटींची संपत्ती असल्याचे शपथपत्राद्वारे माहिती मिळाली आहे.

**हे आहेत अब्जाधीश उमेदवार**

- परिषा प्रताप सरनाईक – (३८१ कोटी) – शिंदे गट– वॉर्ड नंबर ५ क, ठाणे
- बाबाजी पाटील – (१२६ कोटी) – शिंदे गट– वॉर्ड नंबर २९ क, मुंब्रा
- मंदार केणी– (१०५ कोटी) – शिंदे गट, वॉर्ड नंबर २३ ड, कळवा

**हे आहेत कोट्यधीश उमेदवार**

**● शिवसेना**

- हणमंत जगदाळे – (६३.४४ कोटी) ६ ड– लोकमान्य नगर ठाणे
- मनाली पाटील – (६१.६८ कोटी) २५ – पौडपाडा, आतकोनेश्वर

**● भाजप**

- प्रतिभा मढवी – (४३.५७ कोटी) २१ ब – हिंदू–भास्कर कॉलनी
- नंदा कृष्णा पाटील – (५१.२० कोटी) ११ क – वृंदावन, श्रीरंग

**● ठाकरे गट**

- नंदिनी विचारे – (४१.८७ कोटी) १२ क – सिद्धेश्वर–कचराळी तलाव
- महेश्वरी तरे – (२३.४४ कोटी) ११ अ – वृंदावन, श्रीरंग, आझादनगर
- कविता पाटील – (५५.८२ कोटी) २ ब – हिरानंदानी इस्टेट, पातलीपाडा

**● मनसे**

- रेश्मा पवार – (१७.७८ कोटी) २८ ब – आगासन, म्हातार्डी, बेतवडे

**● अपक्ष**

- प्रमिला केणी – (६१.६८ कोटी) २३ ब – कळवा, मनिषानगर, जानकी नगर

# आज जिल्हा परिषद निवडणुकीची घोषणा?

■मुंबई। प्रतिनिधी,

राज्यात महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू असतानाच आता जिल्हा परिषद निवडणुकीबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा कार्यक्रम बुधवारी अथवा याच आठवड्यात जाहीर होण्याची दाट शक्यता आहे. सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. मात्र, सध्या अनेक ठिकाणी महापालिका निवडणुकांची प्रक्रिया सुरू आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. ज्या भागात महापालिका निवडणुका सुरू आहेत, त्याच ठिकाणी जिल्हा परिषद निवडणुकाही होऊ घातल्याने एकाच वेळी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करणे हे प्रशासनासाठी आव्हान ठरत आहे. जानेवारी महिन्यात निवडणूक कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली असल्याची माहिती न्यायालयाला देऊन, प्रत्यक्ष मतदानासाठी काही दिवसांची मुदत मागता येईल का, याचाही पर्याय तपासला जात आहे. बुधवारी होणाऱ्या बैठकीनंतर यासंदर्भात ठोस हालचाली होण्याची शक्यता आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, ७ फेब्रुवारी रोजी मतदान घेण्याचा प्रस्ताव सध्या चर्चेत आहे. मात्र, या संदर्भात निवडणूक आयोगाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही अधिकृत प्रतिक्रिया मिळू शकलेली नाही.

**मनुष्यबळाचा प्रश्न**

राज्य निवडणूक आयोगाकडून बुधवारी (७ जानेवारी) अधिकृत घोषणा होण्याची शक्यता असल्याचे वृत्त आहे. मात्र, जिल्हा परिषद निवडणुकीसाठी सुप्रीम कोर्टाने दिलेली डेडलाइन ओलांडली जाण्याचे संकेत दिसू लागले आहेत. या निवडणुकांसाठी ७ फेब्रुवारी रोजी मतदान होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राज्यात एकाच वेळी सुरू असलेल्या महापालिका निवडणुकांमुळे प्रशासनापुढे मनुष्यबळाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे जिल्हा परिषद निवडणुका फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात घेण्याची मुभा देण्याची विनंती सर्वोच्च न्यायालयाला करण्याबाबत चर्चा सुरू आहे.

**ईव्हीएम पुरेसे**

मतदान यंत्रांच्या उपलब्धतेबाबत कोणतीही अडचण नसल्याचे निवडणूक आयोगाने यापूर्वीच स्पष्ट केले आहे. मात्र, मनुष्यबळाच्या मयार्दा लक्षात घेता निवडणूक कार्यक्रमातील तारखांमध्ये फेरविचार करावा लागेल का, यावर गांभीयार्ने विचार सुरू आहे.



**आयोगाची बैठक**

या पार्श्वभूमीवर बुधवारी निवडणूक आयोगाने प्रशासनाची महत्त्वाची बैठक बोलावली आहे. या बैठकीत महापालिका निवडणुकांची मतमोजणी, त्यावेळी निर्माण होणारी कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती, तसेच जिल्हा परिषद निवडणुकांच्या संभाव्य तारखांवर सविस्तर चर्चा होणार आहे. महापालिका निवडणुका संपल्यानंतर लगेचच जिल्हा परिषद निवडणुका घेणे शक्य आहे का, याबाबत अधिकाऱ्यांकडून स्पष्ट भूमिका जाणून घेतली जाण्याची शक्यता आहे.

# भांडुप बस अपघात तांत्रिक कारणाने नव्हे तर...
# आरटीओ तपासणीत समोर आली माहिती

■मुंबई। प्रतिनिधी,

भांडुप रेल्वे स्टेशनबाहेर गेल्या आठवड्यात झालेल्या भीषण बस अपघाताबाबत आता महत्त्वाची माहिती समोर आली आहे. या अपघातामागे बसमध्ये तांत्रिक बिघाड होता, असा दावा चालकाकडून करण्यात आला होता. मात्र प्रादेशिक परिवहन कार्यालयाने केलेल्या सखोल तपासणीत बसमध्ये कोणताही तांत्रिक दोष नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे हा अपघात चालकाच्या चुकीमुळेच झाल्याचे आता समोर आले आहे.

आरटीओकडून अपघातग्रस्त इलेक्ट्रिक बसची सविस्तर यांत्रिक तपासणी करण्यात आली. या तपासणीत ब्रेकिंग सिस्टीम, हँडब्रेक, एक्सिलेटर तसेच ट्रान्समिशन यंत्रणेत कोणतीही बिघाडाची चिन्हे आढळली नाहीत. वाहन पूर्णपणे यांत्रिकदृष्ट्या सक्षम असल्याचा निष्कर्ष तपासणी अहवालात नोंदवण्यात आला आहे. त्यामुळे बस अचानक हलली आणि अपघात झाला, हा चालकाचा दावा चुकीचा ठरला आहे.

या प्रकरणात चालक संतोष रमेश सावंत (वय ५२) यांनी बसच्या हँडब्रेकमध्ये दोष असल्याने वाहन अनियंत्रितपणे पुढे सरकल्याचे सांगितले होते. मात्र आरटीओच्या अहवालामुळे हा दावा फेटाळण्यात आला आहे. असे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी पल्लवी कोठावडे यांनी सांगितले. त्यामुळे कोणताही यांत्रिक दोष नसल्याने आता तपासाचा रोख मानवी निष्काळजीपणा आणि ठरवून दिलेल्या कार्यपद्धतींचे पालन झाले की नाही, यावर केंद्रित केला जाणार आहे.

भांडुप पोलिस ठाण्याने या प्रकरणातील तपास अधिक तीव्र केला असून चालकाचा जबाब नोंदवण्यात आला आहे. पोलिसांकडून अपघाताच्या क्षणी वाहन कसे हाताळले गेले, आवश्यक सुरक्षात्मक उपाय पाळले गेले का, याचीही तपासणी केली जात आहे. तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपपत्रात आरटीओच्या निष्कर्षांचा वापर केला जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.



**भांडुप अपघातानंतर बेस्ट प्रशासनाचा मोठा निर्णय**

या अपघातानंतर बेस्ट प्रशासनही सतर्क झाले आहे. इलेक्ट्रिक बस आणि पारंपरिक डिझेल बस यांच्या चालवण्याच्या पद्धतींमध्ये असलेल्या फरकांची जाणीव चालकांना करून देण्यासाठी विशेष प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी चालकांचे कौशल्य आणि सुरक्षिततेबाबत अधिक भर देण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# विद्युत वाहिनीचा धक्का लागून मृत्यू

■वाडा। प्रतिनिधी,

वाडा तालुक्यातील तिळसे गावात महावितरणच्या तुटून पडलेल्या विद्युत वाहिनीचा धक्का (शॉक) लागून एका ४५ वर्षीय अपंग इसमाचा दुदैवी मृत्यू झाल्याची घटना आज, रविवारी (०४ जानेवारी) सकाळी ६:३० वाजण्याच्या सुमारास घडली आहे. गणपत लक्ष्मण दळवी (वय ४५ वर्षे झ रा दळवी पाडा, तिळसे) असे मृत तरुणाचे नाव असून या घटनेमुळे परिसरात महावितरणच्या कामावर तीव्र संताप व्यक्त होत आहे. नेहमीप्रमाणे गणपत दळवी हे सकाळी ६:३० वाजण्याच्या सुमारास वाडा येथे कामावर जाण्यासाठी घरातून निघाले होते. दळवी पाडा ते तिळसे स्टॉप या दरम्यान शेतातील रस्त्यावरून चालत असताना महावितरणची तुटून रस्त्यावर पडलेली मुख्य विद्युत वाहिनी त्यांच्या संपर्कात आली. या मुख्य वाहिनीला विद्युत प्रवाह सुरू असल्याने त्यांना जोरदार शॉक बसला. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थ घटनास्थळी धावून आले. याबाबत महावितरणचे कर्मचारी तसेच



पोलीस ठाण्याला तातडीने माहिती देण्यात आली. वाडा पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.या घटनेमागे, महावितरणच्या निष्काळजीपणामुळेच इसमाचा मृत्यू झाल्याचा आरोप मृताच्या नातेवाईकांसह स्थानिक ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. तुटलेली विद्युत वाहिनी रस्त्यावर पडूनही वेळेवर दुरुस्ती न करण्यात आल्याने ही दुर्घटना घडल्याचा आरोप मयताचे पुतणे सुमित दळवी यांनी केला असून, या प्रकरणास जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. तसेच मृत गणपत दळवी यांच्या कुटुंबाला तातडीने आर्थिक नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणीही करण्यात येत आहे.

**थिनरच्या फॅक्टरीत भीषण स्फोट**

घडलेल्या माहितीनुसार, ही घटना सकाळी 10 वाजेच्या दरम्यान घडल्याचे वृत्त आहे. थिनरच्या फॅक्टरीत बाटल्या भरण्याचं काम सुरु असताना स्फोट झाल्याचं चित्र समोर आलं. स्फोटानंतर घटनेवेळी उपस्थित असलेल्या इतर चार ते पाच महिला कामगारांनी तात्काळपणे फॅक्टरीतून पळ काढला, त्या थोडक्यात बचावल्या गेल्या. अपघाताची माहिती मिळताच अमरावती अग्निशमन विभाग आणि राजापेठ पोलिस तात्काळ घटनास्थळी पोहोचले.

# अमरावती एमआयडीसीत थिनर कारखान्यात मोठा स्फोट, महिला कामगाराचा आगीत होरपळून मृत्यू

■अमरावती।प्रतिनिधी,

अमरावती एमआयडीसीत एका थिनर कारखान्यात मोठा स्फोट घडल्याचं चित्र आहे. या स्फोटात महिला कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अमरावतीच्या राजापेठ एमआयडीसी परिसरातील असलेल्या थिनर बनवणाऱ्या एका केमिकल फॅक्टरीत मंगळवारी सकाळी दुर्घटना घडल्याचं सांगण्यात येत आहे. या प्रकरणातील मृत महिलेचं नाव मोनाली कोडापे (वय २९) असे आहे. ती हरदौली, तहसील आर्वी येथील रहिवासी आहे.

**फॅक्टरीला लागलेली आग नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांचे शथीर्चे प्रयत्न**

अग्निशमन दलाने आग आटोक्यात आणण्याचे काम केले होते. संबंधित प्रकरणाची माहिती समोर आली तेव्हा फॅक्टरीला लागलेली आग नियंत्रणात आणण्यात आली. घटनेवेळी गोपी इंडस्ट्रीजचे मालक घटनास्थळी उपस्थित नसल्याचं वृत्त होतं. तेव्हा पोलिसांनी त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, मृत महिलेचा मृतदेह पूर्णपणे जळाला असल्याने, शवविच्छेदनासाठी विशेष प्रक्रिया करण्यात येणार आहे.



**स्फोटात भाजून महिला कामगाराचा मृत्यू**

या स्फोटाच्या कारणाबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. रासायनिक हाताळणी निष्काळजीपणा किंवा तांत्रिक बिघाड–तसेच सर्वच पैलूंचा तपास केला जातोय. सध्या, राजापेठ पोलीस आणि अमरावती अग्निशमन दल संयुक्तपणे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. या प्रकरणी पुनील कुलट म्हणाले की, 'फॅक्टरीत झालेल्या स्फोटात एका महिला कामगाराचा भाजून मृत्यू झाला. संबंधित प्रकरणात घटनेचा सखोल तपास सुरु असल्याचं सांगण्यात येत आहे'. या अपघातामुळे एमआयडीसी परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.

# घटस्फोट, तणाव अन् बापानेच २ चिमुकल्यांचा खून केला अन् नंतर मृतदेह जवळच्या कालव्यात फेकून दिलें




■मुंबई। प्रतिनिधी,

एका व्यक्तीने आपल्या दोन मुलांचा गळा दाबून खून केला आणि नंतर त्यांचे मृतदेह जवळच्या कालव्यात फेकून दिल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर आरोपीने आपल्या आयुष्याची अखेर करण्याचा प्रयत्न केला, परंतु गावकऱ्यांनी त्याला वेळीच रुग्णालयात नेले, जिथे त्याची प्रकृती गंभीर आहे. तेलंगणातील नारायणपेट जिल्ह्यात ही धक्कादायक घटना समोर आली आहे. तेलरु येथील मरिकल मंडल या गावात ही घटना घडल्याची माहिती आहे.

याप्रकरणी नारायणपेट पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीचे नाव शिवराम असे आहे. त्याने त्याच्या कुटुंबाला सांगितले की त्याची दोन्ही मुले आजारी आहेत आणि तो त्यांना उपचारासाठी रुग्णालयात घेऊन जात आहे. या बहाण्याने तो त्याच्या दोन्ही मुलांना ऋत्विक आणि चैतन्य यांना घराबाहेर घेऊन गेला. रात्री उशिरापर्यंत शिवराम आणि मुले परत न आल्याने कुटुंब चिंतेत पडले.

पोलिस तपासात असे समोर आले आहे की, शिवराम मुलांना गावाबाहेरील शेतात घेऊन गेला, जिथे त्याने त्यांचा गळा आवळून खून केला. त्यानंतर त्याने या दोघांचेही मृतदेह जवळच्या कालव्यात फेकून दिले. मुलांची हत्या केल्यानंतर शिवरामने कीटकनाशक प्यायले आणि ट्रान्सफॉर्मरने स्वतःला जाळण्याचा प्रयत्न केला. ही बाब स्थानिक ग्रामस्थांच्या लक्षात आली. त्यांनी तात्काळ त्याला गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल केले. जिथे त्याच्यावर उपचार करण्यात आले. डॉक्टरांच्या मते आरोपीची प्रकृती गंभीर आहे आणि त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

त्यानंतर पोलिसांना या घटनेची माहिती देण्यात आली. माहिती मिळताच पोलिस तात्काळ घटनास्थळी पोहोचले, दोन्ही मुलांचे मृतदेह कालव्यातून बाहेर काढण्यात आले आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन शवविच्छेदनासाठी पाठवले. पोलिसांनी हत्येसह संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे आणि आरोपीची प्रकृती सुधारल्यानंतर त्याची सविस्तर चौकशी केली जाईल असं पोलिसांनी स्पष्ट केलं आहे.


याप्रकरणी गावकऱ्यांनी पोलिसांना सांगितले की, शिवरामने नुकताच आपल्या पत्नीला घटस्फोट दिला होता आणि तो मानसिक तणावात होता. पोलिस या कौटुंबिक पार्श्वभूमीचाही तपासाचा भाग म्हणून विचार करत आहेत.

# समोसेवाल्या काकांनी १० वर्षांच्या मुलीवर केले अत्याचार, क्रूरतेची सीमा गाठत...

■ठाणे। प्रतिनिधी,

ठाणे न्यायालयाने १० वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी एका पुरुषाला २० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. या प्रकरणाचा ३ जानेवारी रोजी निकाल जाहीर करण्यात आला होता. दरम्यान, न्यायाधीश रुबी यू, मालवणकर यांनी म्हटलं की, '३५ वर्षीय आरोपी, ज्याला परिसरातील मुले प्रेमाने समोसावाले काका म्हणायचे, कारण तो त्यांना समोसे खायला द्यायचा. परंतु याच समोशाचे आमिष दाखवून त्याने मुलीचा विश्वास तोडला. याचमुळे न्यायालयाने ही शिक्षा दिल्याचे वृत्त समोर आलं.

आरोपीचं नाव विजयभान असे असून तो ठाणे शहरातील वर्तकनगर परिसरातील



नेहरूनगर झोपडपट्टीतील रहिवासी असल्याचे सांगण्यात येत आहे. त्याला भारतीय न्याय संहिता कलम ३७६ (२) (एन), ५०६ आणि पोक्सो कायद्याच्या कलम ५ आणि ६ अंतर्गत दोषी ठरवण्यात आले होते.

**शिक्षिकेन पीडितेचा रक्तस्त्राव होताना पाहिले**

दरम्यान, या प्रकरणात फियार्दीने दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने पीडितेला जबरदस्तीने आपल्या घरी नेले आणि नंतर ४ जानेवारी २०२४ दरम्यान तिच्यावर अनेकदा लैंगिक अत्याचार केल्याचं वृत्त होतं. तसेच २३ जानेवारी २०२४ रोजी हे प्रकरण उघडकीस आलं. जेव्हा एका शिक्षिकेन पीडितेचा रक्तस्त्राव होताना पाहिले आणि तिच्या आईला कळवले.

**न्यायाधीशांचा प्रकरणाबाबत निकाल...**

न्यायाधीशांनी निकाल देताना म्हटलं की, 'या प्रकरणातील काही तथ्ये आणि परिस्थिती विचारात घेतल्यानंतर लक्षात येतं की, मुलं आरोपी समोसेवाल्याला काका म्हणत होते. त्यादरम्यान, आरोपी हा पीडितेला आपल्या घरी घेऊन जायचा आणि लैंगिक छळ करायचा', असं त्यांनी न्यायालयात बाजू मांडली होती.

**गुन्ह्यासाठी आरोपीला २० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा**

या प्रकरणी तपास अधिकाऱ्यांना कोणतेही साक्षीदार सापडले नाहीत ही एक वस्तुस्थिती पीडितेची साक्ष फेटाळण्यास कारणीभूत ठरू शकत नाही. अशातच आरोपीला ५ हजार रुपये दंड आणि न्यायालयाने पोक्सो अंतर्गत गुन्ह्यासाठी आरोपीला २० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com